# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

May 2022 /Issue. No.3/ Price : Rs. 30/-

North Maharashtra MACCIA Apex Chamber of the State



शतक महोत्सवाकडे वाटचाल करण्याऱ्या महाराष्ट्र चेंबर च्या उत्तर महाराष्ट्र विभागाच्या

## सुवर्ण महोत्सवी वर्षाचा दिमाखदार प्रारंभ

ATLANTIC CITY - NEW JERSEY
bmm CONVENTION 2022
सोहळा अस्तित्वाचा

## बृहन्महाराष्ट्र मंडळ, मराठी विश्व - न्यू जर्सी
## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर

यांच्या संयुक्त विद्यमाने

# BIZCON & BUSINESS SUMMIT

दि. ११ ते १४ ऑगस्ट २०२२ - अटलांटीक सिटी, न्यु जर्सी, अमेरिका



लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृति-शताब्दी १९२२-२०२२
कृतज्ञता पर्व वंदन लोकराजाला

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या अध्यक्षपदी निवड झालेबद्दल

**ललित गांधी यांचा नागरी सत्कार मा. शाहू छत्रपती यांच्या हस्ते संपन्न**

## उत्तर महाराष्ट्र विभागात व्यापार, उद्योगाच्या माध्यमातुन विकासात योगदान देणारे उद्योग समुह, संस्था, व्यक्ति यांचा उत्तर महाराष्ट्र विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यपाल महामहिम भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**विकासरत्न पुरस्कार**



हिंदुस्थान एरोनॉटीक्स लि. चे दिपक सिंघल



महिंद्र ॲण्ड महिंद्र चे गणेश शेणॉय



जैन एरीगेशन चे अशोक जैन, अतुल जैन



बेदमुथा ग्रुप चे के.आर.बेदमुथा, विजय बेदमुथा



महाराष्ट्र सॉल्व्हन्ट एक्स्ट्रॅक्शन चे वसंतलाल अग्रवाल



जिंदाल सॉ लि. चे दिनेशचंद्र सिन्हा



दादासाहेब रावल ग्रुप चे जे. जे. रावल सरकार साहेब



मालपाणी ग्रुप चे राजेश मालपाणी



सह्याद्री फार्म चे प्रशांत जयक्रिष्णाया.

**■ मुखपृष्ठ ■**

उत्तर महाराष्ट्र सुवर्णमहोत्सव समारंभाचे दिपप्रज्वलन करून उद्घाटन करताना महामहिम राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, पालकमंत्री छगनराव भुजबळ, महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख

---

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या अध्यक्ष झाल्याबद्दल कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व संलग्न संस्थांतर्फे ललित गांधी यांचा सत्कार शाहू छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डावीकडून जयेश ओसवाल, शिवाजीराव पोवार, प्रदीपभाई कापडिया, संजय शेटे, आनंद माने, संजय पाटील, धनंजय दुग्गे.

MACCIA 100
GLORIOUS 95 YEARS - MARCHING TOWARDS CENTENARY
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

May 2022 / Issue No. 3

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९६६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **उमेश दाशरथी**
- उपाध्यक्ष
  **करुणाकर शेट्टी**
  **शुभांगी तिरोडकर**
  **रविंद्र माणगावे**
  **सुधाकर देशमुख**
  **चंद्रशेखर पुनाळेकर**
  **तनसुख झांबड**
- प्रभारी सरकार्यवाह
  **सागर नागरे**
- संपादक
  **विनी दत्ता**
- सहसंपादक
  **अविनाश पाठक**
- **शाखा कार्यालय**
- २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक - १. फोनः (०२५३)२५७७७०४ । ई-मेलः nsk@maccia.org.in

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

## अंतरंग

१. मनोगत
२. देश व राज्याची सुवर्ण युगाकडे वाटचाल; महाराष्ट्र चेंबरने महिला उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे
३. उत्तर महाराष्ट्रातील उद्योगांचा सन्मान
४. उत्तर महाराष्ट्र देशातील उद्योगाचे मध्यवर्ती केंद्र बनणार
५. औरंगाबादेतील औद्योगिक, व्यापार क्षेत्रातील एकता देशात आदर्श
६. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी व्यापारी, उद्योजकांसाठी अ‍ॅप
७. २०२६ पर्यंत कोल्हापूर राज्यातील सर्वात मोठे विकसित शहर : पालकमंत्री सतेज पाटील
८. महाराष्ट्राचे अमेरीकेत ब्रँडिंग ऑगस्टमध्ये उपक्रमाचे आयोजन
९. अभूतपूर्व प्रतिसादात वास्तू २०२२ प्रदर्शनाचा समारोप
१०. मुंबईत राजर्षी शाहू स्मारक भवन : मंत्री आदित्य ठाकरेंची घोषणा
११. महाराष्ट्र चेंबरच्या महिला धोरण अंमलबजावणीसाठी महिला समिती राज्यभर दौरे करणार
१२. प्रस्तावित ई-कॉमर्स धोरणावर ‘महाराष्ट्र चेंबर’ तर्फे ललित गांधी यांनी भूमिका मांडली
१३. महाराष्ट्राचे पुढील पंचवार्षिक पर्यटन २०२२-२०२७
१४. "BATATA" can replace all Taxes (Part- II)
१५. GST New Era in 2022 : Important Changes effective 1st January 2022
१६. MAJOR CHANGES IN INCOME TAX EFFECTIVE FROM APRIL 1, 2022
१७. उत्तर महाराष्ट्र विकाससंधी : थोडा है थोडे की जरूरत है ।





# संपादकीय..

**ललित गांधी**
अध्यक्ष

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर' च्या उत्तर महाराष्ट्र विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा शुभारंभ ९ एप्रिल रोजी नाशिक च्या कालीदास कलामंदीरात शानदार समारंभाद्वारे करण्यात आला.

राज्यपाल महामहिम भगतसिंह कोश्यारी यांच्या उपस्थितीने महाराष्ट्र चेंबर च्या लौकीकाला साजेसा असा समारंभ होऊ शकला, राज्याचे महसुल मंत्री नाम. बाळासाहेब थोरात, अन्न पुरवठा मंत्री नाम. छगन भुजबळ, विधानसभेचे अध्यक्ष नाम. नरहरी झिरवाळ, खा. हेमंत गोडसे, खा. उन्मेश पाटील, आमदार देवयानी फरांदे, आमदार राहुल ढिकले आदी मान्यवरांच्या उपस्थितीने व मार्गदर्शनाने कार्यक्रमाची शोभा वृध्दिंगत झाली.

उत्तर महाराष्ट्र विभागातील पदाधिकारी, कार्यकारीणी समिती चे सदस्य व समारंभानिमित्त गठीत विविध समित्यांचे सदस्य या सर्वांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे समारंभ उत्साहात व दिमाखदारपणे संपन्न झाला.

या समारंभाने 'महाराष्ट्र चेंबर' च्या गौरवात व कीर्तीत आणि प्रतिष्ठेत भर पडली असुन सर्वांना नवीन उत्साह व प्रेरणा मिळाली आहे. यामुळे या पुढील काळात आपण सर्व जण मिळुन चेंबरचे काम अधिक प्रभावी व गतीने करण्याचा संकल्प करूया..

संपुर्ण महाराष्ट्रभर चेंबरच्या कार्याची व्याप्ती प्रभावी करण्याचे नियोजन तयार झाले असुन त्याबाबतची कार्यवाही सुरू झाली आहे.

चेंबरच्या शताब्दी वर्षापर्यंत २०२७ पर्यंत सर्व ३६ जिल्ह्यांत कृषि प्रक्रिया, महिला उद्योजिका, उत्पादक या तिन्ही क्षेत्राची मिळुन ३६ क्लस्टर्स आपण उभारणार असुन त्यासाठी आवश्यक ती विशेष कंपनी स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

संपुर्ण राज्याचे नियोजन करत असताना राज्यातील नवउद्योजकांना स्टार्टअप मध्ये नाविण्यपुर्ण कल्पना आणण्याचा युवक युवतींना प्रोत्साहन देण्यासाठी चेंबर विशेष प्रयत्नशील आहे. महिलांना उद्योजकतेच्या संधी व त्यासाठी लागणारे पाठबळ देण्यासाठी चेंबर कटीबध्द आहे.

## जागतिक पटलावर
## महाराष्ट्र चेंबर चे दमदार पाऊल...

महाराष्ट्रातील व्यापार-उद्योग-कृषि-सेवा क्षेत्राला जागतिक बाजारपेठेत स्थान व प्रत्यक्ष व्यापाराच्या संधी मिळवुन देण्यासाठी चेंबर गेली अनेक दशके सातत्याने कार्यरत आहे. अनेक देशांमध्ये आपली व्यावसायिक शिष्टमंडळे जात असतात अनेक देशांचे वाणिज्यदुत व शिष्टमंडळे चेंबरला भेट देत असतात.

महाराष्ट्र चेंबरच्या गौरवपुर्ण ९५ वर्षांच्या इतिहासात आपण प्रथमच जागतिक महासत्ता समजल्या जाणाऱ्या अमेरीकेमध्ये बिझनेस कॉन्फरन्स, बिझनेस समीट व एक्झिबिशन आयोजित करत आहोत. अमेरीकेतील महाराष्ट्रीयन लोकांची अग्रेसर संस्था 'बृहन्महाराष्ट्र मंडळ' गेल्या ४० वर्षापासुन अमेरीकेत महाराष्ट्राचा गौरव वाढवित आहे. यावर्षी बृहन्महाराष्ट्र मंडळ व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर यांनी संयुक्तपणे ११ ते १४ ऑगस्ट दरम्यान अटलांटिक सिटी, न्यु जर्सी, अमेरीका येथे हे आयोजन केले आहे.

महाराष्ट्रातील व्यापार-उद्योग क्षेत्राला थेट अमेरीकेची बाजारपेठ मिळेल तसेच महाराष्ट्रात अमेरीकेची गुंतवणुक आणण्यासाठी सुध्दा ही परिषद महत्वपूर्ण ठरणार आहे.

अमेरीकेतील ५००० लोक या परिषदेत सहभागी होणार असुन भारतातुनही आपण जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन जगभरातील मराठी बांधवांशी आपले संबंध स्थापित करूया.

महाराष्ट्रातील सर्वात छोट्या खेड्यामधील लहान व्यापारी-उद्योजकांपासुन मोठ्यात मोठे उद्योजक या सर्वांच्या सहयोगाने आपल्या महाराष्ट्राचा व पर्यायाने आपल्या भारताच्या विकासामध्ये आपण अधिकधिक योगदान देऊन आपल्या स्वतः च्या प्रगतीबरोबरच देशालाही 'आत्मनिर्भर' बनवुया..

# देश व राज्याची सुवर्ण युगाकडे वाटचाल; महाराष्ट्र चेंबरने महिला उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे - महामहिम राज्यपाल भगतसिंग कोशारी

## क्लस्टर व इन्क्युबेशन सेंटरमुळे राज्यातील व्यापार उद्योगाला चालना मिळेल - ललित गांधी




**महामहिम राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी यांना सन्मानचिन्ह देउन सत्कार करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, सोबत पालकमंत्री छगनराव भुजबळ, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख.**

महाराष्ट्र चेंबरची शतक महोत्सवाकडे वाटचाल, महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्रनाशिक शाखेचे सुवर्ण महोत्सव वर्षात पदार्पण आणि देशाचा अमृत महोत्सव असा सुवर्ण योग जुळून आला आहे. त्यामुळे देशाची वाटचाल सुवर्ण युगाकडे होईल असे सांगितले. देशाच्या व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राच्या विकासात निश्चित महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरचे योगदान महत्वाचे आहे आणि भविष्यातही महाराष्ट्र राज्य व देशाच्या विकासात महाराष्ट्र चेंबरची भूमिका महत्वाची असेल असे प्रतिपादन महामहिम राज्यपाल श्री. भगतसिंग कोशारी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्रनाशिक शाखेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या पदार्पनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी महाकवी कालिदास कलामंदिर येथे केले.

व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राचा विकास करतांना सामाजिक जबाबदारी म्हणून गरीब कुंटूंबाचीही व्यापारी उद्योजकांनी जबाबदारी घेऊन काही कुंटूंब दत्तक घेतल्यास निश्चितच त्याचे समाधानही व्यापारी, उद्योजकांना लाभेल. महिलांनाही प्रोत्साहन देणे आवश्यक असून महाराष्ट्र चेंबरने महिला उद्योजकांसाठी भरीव कार्य करावे असे सांगितले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी प्रास्ताविकांत महाराष्ट्र चेंबरची स्थापनेपासूनच्या कार्याची माहिती सादर केली. चेंबरचे संस्थापक अध्यक्ष शेठ वालचंद हिराचंद यांनी स्वदेशी व्यापार उद्योगांच्या हितासाठी व विकासासाठी महाराष्ट्र चेंबरची १९२७ साली स्थापना केली. तेव्हापासून राज्यातील व्यापार उद्योगांचा विकास करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने महाराष्ट्र चेंबरने विविध उपक्रम, प्रशिक्षण कार्यशाळा, परिषदा, प्रदर्शने आयोजित केल्या. केवळ देशातंर्गतच नव्हे तर जागतिक स्तरावरही राज्यातील व्यापार उद्योग वाढावा व जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने महत्वाची भूमिका बजावली आहे. विविध देशातील चेंबर ऑफ कॉमर्सबरोबर सामंजस्य करारही केले असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

राज्यातील व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्रातील विकासासाठी ६ विभागात ॲग्रो बेस क्लस्टर, महिला उद्योजकता क्लस्टर, उत्पादनाधारीत क्लस्टर या स्वरूपात १८ क्लस्टरची निर्मिती महाराष्ट्र चेंबरने करण्याचे ठरविले आहे. २०२२ मध्ये पहिले ॲग्रो बेस क्लस्टर सिंधुदुर्ग येथे सुरू करण्यात येणार आहे. यासह इन्क्युबेशन सेंटरही राज्यातील उभारण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

# • उत्तर महाराष्ट्राचा सन्मान •

## उत्तर महाराष्ट्रमधील माजी अध्यक्षांचा सत्कार...



उत्तर महाराष्ट्राच्या विकासात महत्वाचे योगदान देणारे महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष खुशालचंद्र पोतदार, हेमंत राठी, संतोष मंडलेचा.

## उत्तर महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवाचे प्रायोजकांचा सत्कार...



सुवर्ण महोत्सवाचे प्रायोजक दिपक बिल्डर चे दिपक चंदे, एसकेडी ग्रुप चे देवरे, डेअरी पॉवर चे दिपक आव्हाड, सोमनाथ पावसे

## महाराष्ट्र चेंबरचे नवीन पेट्रन सभासदांचा सत्कार....



महाराष्ट्र चेंबरचे नवीन पेट्रोन मेंबरर्स रविंद्र पाटील, राहुल देशमुख, अविनाश पाटील, कांतीलाल चोपडा, डॉ. राज नगरकर, शैलेश कुटे.

महाराष्ट्र चेंबर तर्फे उभारण्यात येणाऱ्या क्लस्टर व इन्क्युबेशन सेंटरच्या निर्मितीमुळे राज्यातील व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार असून रोजगारही मोठ्या प्रमाणात निर्माण होईल असे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

सुरूवातीला महामहिम राज्यपाल भगतसिंग कोशारी व नाशिकचे पालकमंत्री छगनरावजी भुजबळ, अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महामहिम राज्यपाल भगतसिंग कोशारी यांचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ, शाल देऊन सत्कार केला.

महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी यांनी महाराष्ट्र चेंबरची शतक महोत्सवाकडे वाटचाल सुरू असून या कार्यक्रमास उपस्थित सर्व व्यापारी, उद्योजक, पत्रकार व मान्यवरांचे मन:पूर्वक स्वागत वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी यांनी केले.

महामहिम राज्यपाल भगतसिंग कोशारी यांच्या हस्ते उत्तर महाराष्ट्राच्या विकासात महत्वाचे योगदान देणाऱ्या महाराष्ट्र




**समारंभास मार्गदर्शन करताना महामहिम राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी, व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, पालकमंत्री छगनराव भुजबळ, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख**







**समारंभास मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, पालकमंत्री छगनराव भुजबळ.**

चेंबरचे माजी अध्यक्ष खुशालचंद्र पोतदार, हेमंत राठी, संतोष मंडलेचा व महिंद्रा ॲण्ड महिंद्राचे गणेशजी शेनॉय, हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल)चे दिपकजी सिंघल, जैन एरिकेशन लिमिटेडचे अशोकजी जैन, अनिल जैन, मालपाणी ग्रुपचे राजेशजी मालपाणी, बेदमुथा ग्रुपचे के. आर.बेदमुथा, अजयजी बेदमुथा, विजयजी वेदमुथा, महाराष्ट्र ऑईल एक्स्ट्रॅक्शन प्रा.लि. चे सरकारसाहेब रावल, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे श्री. चिंतनजी पटेल, सह्याद्री फार्मचे प्रशांतजी क्रिष्णाया, जिंदाल सॉ लिमिटेडचे श्री. दिनेशचंद्राजी सिन्हा यांचा पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच महाराष्ट्र चेंबरचे नविन पेट्रोन मेंबर रविंद्रजी पाटील, राहुलजी देशमुख, अविनाशजी पाटील, कांतीलालजी चोपडा, डॉ. राज नगरकर, शैलेश कुटे व कार्यक्रमाचे प्रायोजक दिपक बिल्डर ॲण्ड डेव्हलपर्सचे श्री. दिपक चंदे, एसकेडी ग्रुपचे देवरे व अंकुरजी सुराणा, शिवानंद इलेक्ट्रॉनिक्सचे महाराज बिरमानी व अशोक देशपांडे, डेअरी पॉवर लिमिटेडचे दिपकजी आव्हाड, धरती धन ग्रुपचे कांतीलालजी चोपडा, सोमनाथ पांडुरंग पावसे, मयुरेश मार्केटिंगचे मयुरेशजी जाधव यांचा महामहिम राज्यपाल श्री. भगतसिंग कोशारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अन्न पुरवठा व नागरी तथा नाशिकचे पालकमंत्री श्री. छगनरावजी भुजबळ यांनी मुंबई-पुण्यानंतर नाशिक वेगाने विकसित होणारे शहर असून मुंबई-पुण्यामध्ये जे जे आहे त्या सर्व सोयीसुविधा, व्यापार उद्योग नाशिकमध्ये येईल त्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. नाशिकमध्ये व्यापार उद्योगांसाठी पोषक वातावरण आहे. चांगले हवामान आहे. पर्यटन, आरोग्य, कृषी आदि क्षेत्रात नाशिक व उत्तर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात व्यापार उद्योगांसाठी संधी उपलब्ध आहेत. व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे सुरू असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले व राज्य सरकारतर्फे पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच नोटाबंदी, जीएसटी व करोनामुळे व्यापार, उद्योगांवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला असून राज्याच्या आर्थिक उत्पन्नावर परिणाम झाला आहे. त्यातून स्थिर स्थावर होत असून निश्चितच महाराष्ट्र राज्य देशात क्रमांक १ चे राज्य बनेल असे पालकमंत्री श्री. भुजबळ यांनी सांगितले.

आभारप्रदर्शन सुवर्णमहोत्सव समितीचे चेअरमन श्री. विजय वेदमुथा यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी उत्तर महाराष्ट्र कार्यकारीणी सदस्यांनी परिश्रम घेतले.





समारंभाच्या उद्‌घाटनप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक अध्यक्ष शेठ वालचंद हिराचंद व पद्‌मश्री बाबुभाई राठी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना महसुल मंत्री बाळासाहेब थोरात, अन्न पुरवठा मंत्री व पालकमंत्री छगन भुजबळ समवेत अध्यक्ष ललित गांधी, उमेश दाशरथी, खासदार हेमंत गोडसे.




महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या 'चेंबर पत्रिका' या माहे मार्च च्या अंकाचे प्रकाशन करताना महसुलमंत्री बाळासाहेब थोरात, पालकमंत्री छगन भुजबळ, खासदार हेमंत गोडसे, चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख.









राज्यस्तरीय कौशल्य विकास परिषदे मध्ये मार्गदर्शन करताना स्वप्निल शहा, स्वामी कंठानंद, मनिष पाटील, संजय कोठेकर

# उत्तर महाराष्ट्र देशातील उद्योगाचे मध्यवर्ती केंद्र बनणार

## बाळासाहेब थोरात; महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची उत्तर महाराष्ट्र विकास परिषद

### महाराष्ट्र चेंबर व्यापार उद्योग क्षेत्राचा मसीहा - पालकमंत्री श्री. छगन भुजबळ





उत्तर महाराष्ट्र विकास परिषदे मध्ये मार्गदर्शन करताना महसुल मंत्री बाळासाहेब थोरात व चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी.

महसुल मंत्री ना. श्री. बाळासाहेब थोरात यांनी नाशिकमध्ये द्राक्ष, कांदा, ऊस, डाळिंब, सोयाबीन आदि पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात असे नमूद केले. कृषी क्षेत्रातील उत्पादनाचा उपयोग करून नविन स्वतचा उद्योग व्यवसाय सुरू करता येईल. समृध्दी महामार्गासोबत एचएएल विमान सेवा सुरू झाल्यामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर औद्योगिक मालाची वाहतूक करता येईल. उत्तर महाराष्ट्रात शेती माल मोठ्या प्रमाणात असल्याने शेतीमालावर आधारीत व्यापार उद्योग सुरू करण्यात यावे या माध्यमातून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होईल. महाराष्ट्र चेंबरने उत्तर महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या मदतीबाबत प्रस्ताव द्यावा त्याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उद्योग मंत्री यांच्यासमवेत महाराष्ट्र चेंबरच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून सरकारकडून व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राच्या वाढीसाठी शासन स्तरावर आवश्यक ती सर्व मदत केली जाईल असे आश्वासन श्री. बाळासाहेब थोरात यांनी दिले.

अन्न पुरवठा व नागरी मंत्री तथा पालकमंत्री श्री. छगनरावजी भुजबळ यांनी देशाच्या विकासात महाराष्ट्र हे सदा अग्रेसर राज्य असून राज्याच्या औद्योगिक विकासात नाशिकचे योगदान हे अनन्यसाधारण असे आहे. या औद्योगिक विकासासोबतच पर्यावरण संतुलनाच्या दिशेने ठोस पावले उचलण्याची गरज असून प्रदुषणविरहित नाशिकचा औद्योगिक विकास होण्यासाठी संकल्प करणे गरजेचे आहे असे मत पालकमंत्री श्री. भुजबळ यांनी व्यक्त केले. तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरने आजपर्यंत औद्योगिक क्षेत्रातील मसीहा म्हणून काम केले आहे. उत्तर महाराष्ट्राच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर व उद्योजकांचे





उत्तर महाराष्ट्र विकास परिषदे मध्ये मार्गदर्शन करताना खासदार हेमंत गोडसे, जळगावचे खासदार उन्मेश पाटील, क्रिडाई चे जितेंद्र ठक्कर

मोठे योगदान आहे. औद्योगिक क्षेत्रांशी संबंधित शासकीय परवानगीसाठी एक खिडकी योजना राबविण्यासाठी शासन व प्रशासनाच्या वतीने प्रयत्न केले जातील. मुंबई व पुण्याच्या पातळीवर नाशिक जिल्ह्याचाही विकास करून जिल्ह्याची आर्थिक शक्ती वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचेही श्री. भुजबळ यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी प्रास्ताविकात महाराष्ट्र चेंबरची स्थापना १९२७ साली स्वातंत्र्यपूर्व काळात झाली. त्यावेळी स्वदेशी व्यापार उद्योगाला चालना मिळावी व्यासपीठ मिळावे यासाठी शेठ वालचंद व त्यांच्या सहकाऱ्यांनी महाराष्ट्र चेंबरची स्थापना केली. महाराष्ट्रातील व्यापार, उद्योगांच्या विकासासाठी सातत्याने महाराष्ट्र चेंबरने केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने अविरत कार्य सुरू आहे. महाराष्ट्र चेंबरची शतक महोत्सवाकडे वाटचाल सुरू असून उत्तर महाराष्ट्रनाशिक शाखेचा सुवर्ण महोत्सव वर्षप्रारंभनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच देशात राज्याला पहिल्या क्रमांकावर नेण्यासाठी महाराष्ट्र चेंबर कायम प्रयत्नशील आहे. येत्या दोन वर्षात राज्याच्या सहा विभागात महिला उद्योजकता क्लस्टर, कृषी उत्पादनाधारीत क्लस्टरची स्थापना करण्यात येणार असून राज्यातील व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राचा क्लस्टरच्या माध्यमातून विकास करण्यात येणार आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीही होणार असल्याचे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी सांगितले. तसेच उत्तर महाराष्ट्र विकास परिषदेत होणाऱ्या चर्चेतील मुद्यांवर श्वेत पत्रिका तयार करून केंद्र व राज्य सरकारकडे सादर करण्यात येईल असे सांगितले.

पहिल्या सत्रात उत्तर महाराष्ट्र विकास परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. उत्तर महाराष्ट्र विकास परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे महसुल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री श्री. छगनराव भुजबळ, नाशिकचे खासदार श्री. हेमंत गोडसे, जळगावचे खासदार श्री. उन्मेश पाटील, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री. ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. उमेश दाशरथी, उपाध्यक्ष श्री.सुधाकर देशमुख उपस्थित होते.

सुरवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. उपाध्यक्ष श्री.सुधाकर देशमुख यांनी उपस्थित प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे स्वागत केले. नाशिक शाखेचे को-चेअरमन श्री. संजय सोनवणे यांनी प्रास्ताविक केले.

प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे महसुल मंत्री बाळासाहेब थोरात, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री श्री. छगनराव भुजबळ, नाशिकचे खासदार हेमंत गोडसे यांच्या पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र चेंबर पत्रिका अंकाचे प्रकाशन महसुल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री श्री. छगनराव भुजबळ, नाशिकचे खासदार श्री. हेमंत गोडसे, अध्यक्ष श्री. ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. उमेश दाशरथी, उपाध्यक्ष श्री.सुधाकर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

नाशिकचे खासदार श्री. हेमंत गोडसे यांनी नाशिकच्या कनेक्टिव्हीच्या सक्षमीकरणावर विशेष लक्ष दिले असून विमानसेवा सुरू झाली असून मध्यंतरी पडलेला खंड दूर झाला असून लवकरच नविन विमान सेवा सुरू होणार असल्याचे सांगितले. नाशिक-मुंबई महामार्गाचे वडपे-गोंदे सहा पदरीकरण करण्याच्या कामाला परवानगी मिळाल्याचे सांगितले. शहराबाहेरचा राज्य मार्ग-३७ विकसित केला तर सक्षम रिंगरोड उपलब्ध होणार आहे. शहराबाहेरचा व अंतर्गत रिंगरोड सक्षम करण्याची गरज असल्याचे सांगितले.

डिफेन्स इनोव्हेशन हबचा डीपीआर निमा तयार करणार होती, तसेच इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरर्स क्लस्टरसाठी १०० एकर जागेचा शोध सुरू आहे. सिपीआर आय लॅब तयारीच्या मार्गावर आहे. अप्पर वैतरणा, कडवा, देवलिंकच्या माध्यमातून पाणी उपलब्ध झाल्याने सिन्नरला डिएमआयसीच्या माध्यमातून ८ ते १० हजार एकरची औद्योगिक वसाहत तयार होऊ शकेल असे खासदार गोडसे यांनी सांगितले.

खासदार उन्मेश पाटील यांनी उत्तर महाराष्ट्रात मोठे उद्योग आणणे, नवे धोरण यातून उद्योग चळवळ उभारून उत्तर महाराष्ट्र समृध्दीकडे नेण्याचा प्रयत्न या परिषदेतून होत असल्याचे दिसते. उत्तर महाराष्ट्राला बुस्ट कसा देता येईल यावर विचार होण्याची गरज असून व्हायब्रंट नॉर्थ महाराष्ट्र करण्यासाठी संकल्प करू असे सांगितले. तसेच उत्तर महाराष्ट्राला एमएसएमईचे फ्रॅग्रंस सेंटर उभारल्यास ४०० ते ५०० कोटी रूपयांची उद्योगांची उभारणी या भागात करता येणार आहे. त्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला पुढे नेण्याचा प्रयत्न करता येणार असल्याचे जळगावचे खासदार उन्मेश पाटील यांनी सांगितले.

श्री. जितेंद्र ठक्कर यांनी उद्योग, व्यापार व बांधकाम क्षेत्रातील विविध प्रश्न व अडचणी मांडल्या. व्यापारी, उद्योजक, बांधकाम व्यावसायिक विविध परवानग्यां मिळविण्यातच अडकला जात आहे. रिफ्युजल ऑडिट सिस्टिम सुरू केल्यास आपोआप बंधने येतील. इज ऑफ डुंईग बिझिनेस संकल्पना राबविण्यासाठी प्रयत्न होणे अपेक्षित आहेत. १९९८ सालापासून रियल इस्टेट उद्योगांसाठी पॉलिसी २ ते ३ टक्क्यांपेक्षा जास्त स्टॅम्प ड्युटी नसावी. एफएसआय आहे तो वापरला जात नाही. यासाठी आर्किक्टेटना सक्षम करण्याची गरज आहे. बांधकाम क्षेत्र १५०० कोटी रूपयांचा लेबर सेस देतो. या सेसपोटी ८ हजार कोटीहून जास्त रक्कम पडून आहे. तो निधी कसा वापरता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे. कौशल्य विकास करण्यासाठी कार्यक्रम होतात मात्र नाशिकला कौशल्य महाविद्यालय सुरू करावे असे प्रतिपादन श्री. जितेंद्र ठक्कर यांनी केले.

नाशिक शाखा चेअरपर्सन सौ. सुनिता फाल्गुने यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन शिल्पा बेंडे यांनी केले. कार्यक्रमास महाराष्ट्र चेंबरचे विश्वस्त, कार्यकारीणी सदस्य, सभासद, व लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी उपस्थित होते.

◆◆◆

# कौशल्य विकासासह चांगले मार्गदर्शन मिळाल्यास युवकांना उद्योजक होता येईल

## - विधानसभा उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ




महाराष्ट्र कौशल विकास परिषदे मध्ये मार्गदर्शन करताना विधानसभा अध्यक्ष नरहरी झिरवाळ समवेत व्यासपिठावर अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, स्वप्निल शहा.

महाराष्ट्र चेंबरचे कार्य कौतुकास्पद, व्यापार उद्योगांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन - विधानसभा उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ

शिक्षण क्षेत्रात प्रगती खुप झाली आहे पण शिक्षण पूर्ण झाले की नोकरी मिळेलच असे नाही. कौशल्य विकास करून प्रामाणिकपणे व कष्ट करण्याची तयारी असल्यास निश्चित यश मिळते. आदिवासी युवकांसाठी दिंडोरी येथे आदिवासी औद्योगिक वसाहत सुरू होणार आहे. त्याबाबतची संकल्पना श्री. झिरवाळ यांनी थोडक्यात सांगितले. महाराष्ट्र चेंबरचे कार्य कौतुकास्पद असून राज्यातील व्यापार उद्योगांच्या विकासाचे महत्वाचे कार्य चेंबर करत असून चेंबरने नेहमी नवनवीन करण्यावर भर द्यावा, व्यापार उद्योगांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी दिले.

अध्यक्ष ललित गांधी यांनी मनोगतात कौशल्य विकास हा अतिशय महत्वाचा विषय असून गेल्या ५ वर्षात सरकारने कौशल्य विकासासाठी पैसा खर्च केला. मात्र अपेक्षित निकाल न मिळाल्यामुळे त्यांच्या धोरणामध्ये अनेक नविन बदल झाले आहेत. महाराष्ट्र चेंबरच्या बिझनेस सोल्युशन्स पॉलिक्निक प्रोग्राम या उपक्रमातंर्गत महाविद्यालय, उद्योग व विद्यार्थी यांना एकत्रित आणून विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाधारीत



महाराष्ट्र कौशल विकास परिषदे मध्ये विधानसभा अध्यक्ष नरहरी झिरवाळ यांचा सन्मानचिन्ह देवुन सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, स्वप्निल शहा.

नोकरी व उद्योगांना त्यांच्या गरजेनुसार कौशल्यापूर्ण अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

सरकारने कौशल्य विकास करण्यासाठी राज्यात ६ हजार संस्थांना काम दिले होते. गेल्या ५ वर्षात या संस्थांनी चांगले





**महाराष्ट्र चेंबर व सोच संस्थेत झालेल्या सामंजस्य कराराची प्रत विधानसभा उपाध्यक्ष श्री नरहरी झिरवाळ यांच्या उपस्थितीत देतांना अध्यक्ष ललित गांधी व सोच संस्थेच्या सौ. पल्लवी गांगुर्डे, व्ही. नामदेव. तर दुसऱ्या छायाचित्रात ब्लुमार्क सॉफ्टवेअर कंपनी व महाराष्ट्र चेंबरमध्ये झालेल्या कराराची प्रत विधानसभा उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ यांच्याकडे देतांना ब्लुमार्क सॉफ्टवेअर कंपनीचे गोविंद सदावर्ते.**

कामही केले आहे. मात्र सरकारकडून काही त्रुटी काढून या संस्थांची देणी थकविण्यात आली आहे. महाराष्ट्र चेंबर या संस्थांच्या बरोबर असून सरकारने या संस्थांची देणी द्यावी यासाठी विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनीही लक्ष द्यावे असे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, कार्यकारीणी सदस्य स्वप्निल शहा उपस्थित होते.

मनिष पाटील यांनी प्रास्ताविकात महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरने उद्योगांना कौशल्यपूर्ण मनुष्यबळ, विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्याधारीत नोकरी व नविन स्टार्टअप करणे व रोजगार निर्मिती करण्यासाठी बिझनेस सोल्युशन्स पॉलिक्लिनिक प्रोग्रामची सुरूवात केल्याचे सांगितले. या प्रोग्राममध्ये यावर्षी ३० हजार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून उद्योगांसाठी तयार करण्यात येणार आहे. आतापर्यंत ३ हजार ५०० विद्यार्थी यशस्वी झाल्याचे सांगितले.

याप्रसंगी कौशल्य विकासासाठी महाराष्ट्र चेंबर व सोच संस्थेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व सोच संस्थेच्या सौ. पल्लवी गांगुर्डे, व्ही. नामदेव यांच्या सामंजस्य कराराच्या प्रती हस्तांतरीत केल्या.

महाराष्ट्र चेंबर व ब्लूमर सॉफ्टवेअर कंपनीमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व ब्लूमार्क सॉफ्टवेअर कंपनीचे गोविंद सदावर्ते यांनी कराराच्या प्रती हस्तांतरीत केल्या. या करारातंर्गत ब्लूमार्क सॉफ्टवेअर कंपनीतर्फे महाराष्ट्र चेंबरच्या सभासदांना मोफत वेबसाईट तयार करून देण्यात येणार आहे.

कार्यकारीणी सदस्य स्वप्निल शहा यांनी महाराष्ट्र शासनाने संस्थांमार्फत युवकांना प्रशिक्षण देण्याचा व रोजगार देण्याचा खुप चांगला उपक्रम सुरू केला असल्याचे सांगितले. व्हिटीपी संस्थांच्या अडचणींची माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरतर्फे सीएसआर फंडातून व्हिटीपी संस्थांना आर्थिक मदत करण्यात यावी जेणेकरून बॅचेस नसतील त्यावेळी उद्योगाधारीत बॅचेस व्हिटीपी संस्था राबवतील व त्यांचे आर्थिक चक्र सुरू राहिल असे सांगितले.

त्र्यंबक येथील श्री रामकृष्ण आरोग्य संस्था विवेकानंद योग केंद्राचे स्वामी कंठानंद यांनी मंत्रोच्चाराने आपल्या मार्गदर्शनाला सुरूवात केली. शास्त्रांची अनुभूती त्याच्या अभ्यासाने होते मात्र अनेकांना त्याचे आकलनच होत नाही. माणसाने नेहमी होलीस्टिक दृष्टीकोन ठेवला पाहिजे त्यामुळे कोणतेही काम यशस्वी होते. गुजराती व्यापाऱ्यांचे उदाहरण दिले की, गुजराती व्यापारी दुसऱ्या व्यापाऱ्याला सांगतो की, दोन पैसे तुम्ही कमवा दोन पैसे आम्ही कमवू असा व्यापार करू. गोष्टी सोप्या करा, सोप्या ठेवा असे स्वामी कंठानंद म्हणाले.

मी नाशिककर फोरमचे संजय कोठेकर यांनी नाशिक व उत्तर महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने चित्रफितीद्वारे माहिती सादर केली. नाशिकमध्ये असलेल्या पायाभूत सोयीसुविधा, व्यापार, उद्योग, शिक्षण, आयटी, टुरिझम, आरोग्य यासह विविध क्षेत्राची माहिती कोठेकर यांनी दिली. काय आहे आणि काय पाहिजे याबाबत थोडक्यात सांगितले.

एसकेडीचे अंकुर सुराणा यांनी महाराष्ट्र व मध्यप्रदेश शासनाच्या सबसिडीबाबत चित्रफितीद्वारे माहिती दिली. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रॉनिक्स पॉलीसी २०१६, पॅकेज स्किम ऑफ इन्सेटिव्ह (पीएसआय-२०१९), स्पेशल सबसिडी वुमन एंटरप्रेनर पॉलिसी-२०१७, इलेक्ट्रिक व्हेकल पॉलीसी -२०१८ यांची माहिती दिली. प्रोजेक्ट नुसार व झोननुसार त्यांचे फायदे असल्याची माहिती अंकुर सुराणा यांनी दिली.

मनिष पाटील यांनी बिझनेस सोल्युशन्स पॉलिक्लिनिक



**राज्यस्तरीय कौशल्य विकास परिषदेच्या चर्चासत्रात सहभागी सीआयआय चे चेअरमन श्री. सुधीर मुतालिक, सिम्बॉयसिसच्या डॉ. वंदना सोनवणे, संदिप युनिर्व्हसिटीचे डॉ. दिपक पाटील, अरली सिडस्‌चे श्री. मनन पटेल यांचा अध्यक्ष ललित गांधी यांनी सन्मान चिन्ह देऊन सत्कार केला.**

प्रोग्रामची चित्रफितीद्वारे माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उमेश दाशरथी, सीआयआयचे चेअरमन सुधीर मुत्तालिक, सिम्बॉयसिसच्या डॉ. वंदना सोनवणे, संदिप युनिर्व्हसिटीचे डॉ. दिपक पाटील, अर्ली सीडसचे मदन व्यासपीठावर उपस्थित होते.

महाविद्यालयात मिळणारे शिक्षण आणि प्रत्यक्षात उद्योगांना लागणारे कौशल्य हे विद्यार्थ्यांकडे नसल्यामुळे अडचणी निर्माण होत आहे. विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण हे कौशल्याधारीत असणे महत्वाचे आहे. त्यासाठी शासनाने शिक्षणाचे धोरण ठरविले असून त्यानुसार काम सुरू आहे. मात्र तरीही अपेक्षित पाहिजे तसे परिणाम दिसून येत नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरण ठरविणे गरजेचे असून शिक्षणामध्ये उद्योगांतील प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन अपेक्षित असल्याचे सर्वांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सीआयआयचे चेअरमन सुधीर मुत्तालिक, सिम्बॉयसिसच्या डॉ. वंदना सोनवणे, संदिप युनिर्व्हसिटीचे डॉ. दिपक पाटील, अर्ली सीडसचे मनन पटेल यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

उत्तर महाराष्ट्र नाशिक शाखेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षांच्या प्रारंभानिमित्त दिवसभरात आयोजित उत्तर महाराष्ट्र विकास परिषद, राज्यस्तरीय कौशल्य विकास परिषद या तीन सत्रात झालेल्या कार्यक्रमात सहभागी प्रमुख पाहुणे, तज्ञ मार्गदर्शक, सभासद व कार्यक्रम यशस्वीतेसाठी उत्तर महाराष्ट्र कार्यकारीणी सदस्यांचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी आभार मानले.



**उत्तर महाराष्ट्र सुवर्ण महोसत्व समारंभ यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतलेले उत्तर महाराष्ट्र विभागातील गव्हर्निंग काऊन्सील सदस्य, विविध समिती सदस्य व पदाधिकारी अध्यक्ष ललित गांधी यांच्या समवेत**

# कार्यकारीणी समिती सदस्य, तज्ञ समिती चेअरमन यांचे कार्य व अधिकार याविषयावर कार्यशाळा संपन्न

## कार्यकारीणी सदस्यांनी स्थानिक व्यापारी, औद्योगिक संघटनाशी समन्वय करणे आवश्यक - ललित गांधी




कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना अध्यक्ष ललित गांधी समवेत व्यासपीठावर उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, रविंद्र मानगावे, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, तनसुख झांबड, चंद्रशेखर पुनाळेकर

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर ही राज्यातील व्यापारी, उद्योग, कृषी क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करणारी शिखर संस्था आहे. राज्यातील व्यापारी, औद्योगिक संघटना या महाराष्ट्र चेंबरचे सभासद आहेत. कार्यकारीणी सदस्यांनी आपल्या भागातील स्थानिक व्यापारी, औद्योगिक संघटनांशी समन्वय करून त्यांच्या समस्या व अडचणी सोडविणे आवश्यक आहे. ज्या संस्था सभासद नसतील त्यांना सभासद करून घेणे, महाराष्ट्र चेंबरचे कार्य तळागाळात पोहचविण्यासाठी संघटनांशी समन्वय आवश्यक असल्याचे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबर ही सामाजिक संस्था आहे मात्र संस्थेचा उद्देश व्यापार उद्योगांचा विकास करणे हा आहे. चेंबरचा सभासद झाल्यानंतर प्रत्येक सभासदांच्या व्यापार उद्योगांचा विकास झाला पाहिजे असे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र शाखेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त हॉटेल एक्सप्रेस इन येथे कार्यकारीणी सदस्य, चेअरमन, को-चेअरमन यांच्यासाठी दिवसभराची कार्यशाळा दि. ८ एप्रिल २०२२ रोजी संपन्न झाली.

कार्यशाळेत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, मोटिव्हेशनल स्पीकर चकोर गांधी यांनी मार्गदर्शन केले. कार्यकारीणी सदस्यांनी आपला व व्यवसायाचा परिचय करून दिला. तसेच तज्ञ समितीचे चेअरमन व को-चेअरमन यांनी वर्षभरात आपल्या समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती सादर केली.

कार्यशाळेच्या सुरवातीला अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर, उपाध्यक्ष तनसुख झांबड, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.

महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक अध्यक्ष शेठ वालचंद हिराचंद व पद्मश्री बाबुभाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

याप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी यांचा सन्मानचिन्ह व बुके देऊन कार्यकारीणी सदस्य दत्ता भालेराव यांनी स्वागत व सत्कार केला. वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी यांचा सन्मानचिन्ह व बुके देऊन कार्यकारीणी सदस्य दत्ता भालेराव यांनी स्वागत व सत्कार केला.

महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र शाखा सुवर्ण महोत्सव समितीचे चेअरमन श्री. विजय वेदमुथा यांनी शनिवार दि. ९ एप्रिल २०२२ रोजी आयोजित उत्तर महाराष्ट्र विकास परिषद, होणार असून सर्व कार्यकारीणी सदस्य, तज्ञ समितीचे चेअरमन, को-चेअरमन व उपस्थितीत सर्व सदस्यांनी कार्यक्रमास उपस्थितीत रहावे असे सांगितले.

वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. उमेश दाशरथी यांनी कार्यशाळेचे वक्ते श्री. चकोर गांधी यांचा परिचय करून दिला. श्री. चकोर गांधी यांनी सुरवातीला शेठ वालचंद हिराचंद यांनी सुरूवात कशी केली याची माहिती दिली. तसेच शेठ वालचंद हिराचंद यांचे जिंकले जल, आकाश, भूमी हे पुस्तक आयुष्यात एकदा तरी वाचावे असे सांगितले.



**कार्यशाळेत चेंबरचे संस्थापक अध्यक्ष शेठ वालचंद हिराचंद व पद्मश्री बाबुभाई राठी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पणप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष रविंद्र मानगावे, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, चंद्रशेखर पुनाळेकर, तनसुख झांबड, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख.**

कोरोना काळात बिझनेसच्या बाबतीत तुम्ही काय शिकलात?असे विचारले. त्याकाळात कळत नकळत चांगल्या गोष्टी केल्या. दोन वर्ष घरी बसून उत्पन्न बंद असतांना आपण वेळ निभावून नेऊ शकतो हे शकलो. मनुष्य सामाजिक आहे तो एकटा घरात राहूच शकत नाही कोरोनानंतर जसेजसे व्यापार उद्योग सुरू झाले ते प्रचंड वाढले. काही धंद्या गेला तो गेलाच जसे हॉटेल, रेस्टारंटचा व्यवसाय गेला.

कळत नकळत थोडे चांगले करत आहोत नशिबाची साथ आहे पैशाची इनइफेक्शियन्सी दाखवतो. प्रत्येक जण म्हणतो गावाकडे मार्केट नाही त्यामुळे प्रत्येक जण मुंबई, पुण्याकडे जातो. जनरल इलेक्ट्रिकचे सीईओ जॅकवेल्स यांचे जॉग्रफी बिकम हिस्ट्री वाक्य आहे. लिमिट कुठे आहे. लिमिटच नाही तुम्ही करू शकता इच्छा शक्ती पाहिजे. पहिले क्लास घरी घेत होते आता ऑनलाईन सुरू झाले आहे कोणी युएस मधून तर कोणी युकेतून शिकत असल्याचे श्री. चकोर गांधी यांनी सांगितले.

शिक्षण आणि प्रशिक्षण याच्यासाठी तर ऑनलाईन लिमिट लेस आहे. किती लोक घरी बसून स्वयंपाक शिकले, रेसीपी शिकले, रोज नवीन काही तरी ऑनलाईन पोस्टटाकत होते. सोसायटी, व्यापार उद्योगांच्या ऑनलाईन मिटिंग होत होत्या.

सावधान धंदा बदलतो आहे. जेवढे बदल शंभर वर्षात झाले नाही, गेल्या १० वर्षात झाले नाहीत तेवढे बदल दोन वर्षात झाले आणि रोज बदल घडत आहेत. उदाहरण देतांना व्यवसाय गुरू श्री.प्रल्हाद काकड म्हणतात छोटयात छोटी गोष्ट बनवा पण मोठ्या प्रमाणात बनवा लोकांची गरज ओळखून काम करा. एव्हरेस्ट मसाले सह विविध कंपन्यांची उदाहरणे श्री. चकोर गांधी यांनी दिली.

पोट भरलेले असेल तर माणूस शांत बसतो म्हणून आत्ताच्या पिढीला व्यापार उद्योग करण्यासाठी त्यांच्या पोटातील आग जीवंत राहिल असा मेसेज त्यांना देणे महत्वाचे आहे.

व्यापार, उद्योग सुरू करतांना अथवा व्यवस्थित सुरू ठेवण्यासाठी फायनान्सचा प्रश्न सर्वांसमोर असतो. कारण पैसा असतो मात्र तो चुकीच्या ठिकाणी वापरला जातो. त्यासाठी सर्वांना फायनान्स एज्युकेशन देणे महत्वाचे आहे. महाराष्ट्र चेंबरने व्यापाऱ्यांमध्ये जागृती करण्यासाठी राज्यात ठिकठिकाणी फायनान्स एज्युकेशन विषयावर कार्यक्रम आयोजित करावे असे गांधी यांनी सांगितले.

तसेच व्यापार-उद्योगांमधील महिलांचा सहभाग महत्वाचा आहे किंवा त्यांना स्वतंत्र व्यापार उद्योग करू द्यावा. तसेच मुलांना फुकटचा सल्ला देऊ नये. त्यांना त्यांचा व्यापार उद्योग करू द्यावा.सल्ला द्यावा मात्र असेच केले पाहिजे असा आग्रह करू नये असे चकोर गांधी यांनी सांगितले. तसेच येणारी २०-२५ वर्ष व्यापार उद्योगांसाठी तुफान आहेत प्रत्येकाने हिम्मत करून व्यापार उद्योग करावा असे सांगितले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी चकोर गांधी यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी यांनी विविध समित्यांच्या कामाच्या माहीतीचे सादरीकरण केले. या समितींच्या चेअरमन यांनी आपल्या समितीच्या पुढील कार्याचे नियोजन सादर केले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सह्याद्री फार्मचे विलास शिंदे यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला व विलास शिंदे यांचा परिचय करून दिला.

सह्याद्री फार्मचे विलास शिंदे यांनी सांगितले की, सहकारी संस्था महाराष्ट्राला नवीन नाहीत. अनेक सहकारी संस्था चांगल्या सुरू आहेत तर काही अडचणीत आहेत. सहकारी संस्थामार्फत अनेक उद्योग उभे राहिले. राज्याच्या विकासात सहकारी चळवळीचे योगदान मोठे आहे. काळाच्या ओघात काही दोषही निर्माण झाले. सहकारी संस्थांकडे भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, राजकारण यामुळे बघण्याचा दृष्टीकोन नकारात्मक झाल्याचे शिंदे म्हणाले.

सह्याद्री फार्मचा प्रवासाची माहिती शिंदे यांनी उपस्थितांना दिली. प्रोफेशनल को-ऑपरेटिव्ह संस्था म्हणून

अमूलचा आदर्श आहे. तो आदर्श समोर ठेवून कृषी क्षेत्रात काम सुरू केले. कृषी क्षेत्रात काम करण्यास अनेक संधी आहेत. सुरवातीला सह्याद्रीने द्राक्षाबाबत काम केले आता द्राक्षापुरते मर्यादित न राहता इतर फळ व भाजीपाला बाबत सह्याद्री फार्म करत असल्याचे सांगितले. प्रत्येक पीकाकड उद्योग म्हणून बघावे. कृषी क्षेत्रात काम केल्यास ग्रामीण भागात रोजगार निर्माण होईल. गावांची समृध्दी होईल असे विलास शिंदे यांनी सांगितले.

यावेळी अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या ॲग्रिकल्चर समितीच्या चेअरमन पदी श्री. विलास शिंदे यांची नियुक्ती केल्याचे जाहीर केले.

कार्यकारीणी सदस्यांनी आपली व आपल्या व्यवसायाची ओळख याप्रसंगी करून दिली. तज्ञ समितीच्या चेअरमन व को-चेअरमन यांनी आपली व आपल्या व्यवसायाची ओळख करून दिली तसेच तज्ञ समितीच्या उपक्रमांची माहिती चित्रफितीद्वारे सादर केली.

अध्यक्ष ललित गांधी यांनी आजच्या कार्यशाळेच्या माध्यमातून कार्यकारीणी सदस्य, तज्ञ समितीचे चेअरमन, को-चेअरमन यांना त्यांच्या कामाची व अधिकाराची माहिती देण्याचे काम आहे. मात्र जे कार्यकारीणी सदस्य नाहीत अशा नविन सदस्यांना तज्ञ समितीत सामावून घेण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले. तसेच उपस्थित कार्यकारीणी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

तसेच महाराष्ट्र चेंबरतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. कोल्हापूर येथे व्हायब्रंट महाएक्स्पो २०२२ दि. १५ ते १८ एप्रिल २०२२ रोजी होणार असून या प्रदर्शनास सर्वांनी भेट द्यावी असे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी सांगितले.

पुणे येथे महाराष्ट्र चेंबर, जीतो, पुना मर्चंट चेंबर, पुना व्यापारी महासंघाच्या संयुक्त विद्यमाने जीतो कनेक्ट व आंतरराष्ट्रीय व्यापारी परिषद दि. ६,७ व ८ असे दिवस आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. प्रदर्शनात बी२बी, बी२सी होणार असून प्रदर्शनास ५ लाख लोक भेट देणार असल्याचे सांगितले. या प्रदर्शनात राज्यात, देशात व जगात व्यापार उद्योगांच्या नवीन संधी याविषयावर चर्चा व मार्गदर्शन होणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. या प्रदर्शनासाठी कार्यकारीणी सदस्यांनी आपल्या भागातील स्थानिक व्यापारी औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना भेटून त्यांना आमंत्रित करावे व प्रदर्शनात सहभागी होण्यास सांगावे तसेच यामुळे स्थानिक व्यापारी औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी समन्वय होऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घ्या व त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले.

पुना मर्चंट चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया यांनी जीतो कनेक्ट २०२२ या प्रदर्शनाची माहिती दिली. प्रदर्शनात ज्वेलरी, ऑटो, सॉफ्टवेअर, शिक्षण यासह विविध क्षेत्राचा सहभाग या प्रदर्शनात असणार आहे. २०१६ साली प्रदर्शनास सुरूवात झाली होती. प्रदर्शनास अतिशय चांगला प्रतिसाद मिळत असून प्रदर्शनात महाराष्ट्र चेंबरच्या सर्व कार्यकारीणी सदस्यांनी सहभागी व्हावे असे सांगितले.

अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरतर्फे डिसेंबर २०२२ मध्ये (मायटेक्स) महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड प्रदर्शनाचे आयोजन बीकेसी, मुंबई येथे करण्यात येत असल्याची माहिती दिली. अतिशय भव्य असे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार असून यामुळे निश्चित व्यापाराला नवीन दिशा मिळेल असे सांगितले.

राज्यातील व्यापारी उद्योजकांना डिजीटल मार्केटिंगसाठी महाराष्ट्र चेंबर व ब्लूमार्क कंपनीतर्फे बेसीक वेबसाईट मोफत तयार करून देण्यात येणार असल्याचे सांगितले.

नाशिकच्या कार्यालयासाठी नवीन जागा घेण्यात येणार असून त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत एमआयडीसीकडे पत्रव्यवहार केला आहे. तसेच महिला क्लस्टरही लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

अध्यक्ष ललित गांधी यांनी शेवटी दिवसभर झालेल्या कार्यशाळेचा गोषवारा सांगून उपस्थितांना चेंबरचे कार्य, कार्यकारीणी सदस्य, तज्ञ समितीचे चेअरमन, को-चेअरमन यांचे कार्य व अधिकार यांची माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. तसेच उपस्थित कार्यकारीणी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

यानंतर मनोरंजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.



कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना चकोर गांधी व उपस्थित मान्यवर

# स्पर्धेत टिकून राहण्यासाठी व्यापारी, उद्योजकांसाठी ॲप

**औरंगाबाद** : व्यापार, उद्योग क्षेत्रात मोठ्या कंपन्या आल्यानंतर देशभरातील लघुव्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले. देशात ८५० हून अधिक व्यापारी, संघटना आहेत. या संघटनांची बांधणी अधिक बळकट व्हावी आणि मोठया कंपन्यांना टक्कर देता यावी. यासाठी लघुव्यावसायिकांसाठी ॲप बनविण्यात येणार आहे. यासाठी सरकारपातळीवरही मदत मागितली जाईल, अशी माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

**महाराष्ट्र चेंबरने घेतला पुढाकार**

गांधी म्हणाले, की राज्यात २८०० कोटींचा व्यवसाय होतो. या सर्व व्यावसायिक, लघुउद्योजकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी चेंबर पुढाकार घेणार आहे. मोठया कंपन्यांचे आव्हान आहे. घरपोच सेवेसह अनेक योजनांच्या माध्यमातून या कंपन्यांनी लघुव्यावसायिकांसमोर उभे केलेल्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी स्थानिक पातळीवर ॲप विकसित करण्याचे प्लॅनिंग आहे. अगदी सुरुवातीला 'बी टू बी' म्हणजे व्यावसायिक ते व्यावसायिक असे व्यवहार करण्यासाठी या ॲपचा उपयोग केला जाईल. त्याची उपयुक्तता सिध्द झाली की, ग्राहकांसाठीही त्याचा उपयोग केला जाईल. अर्थात या सगळ्यासाठी काही कालावधी लागेल. तांत्रिक सपोर्टसह सरकारी पातळीवरुनही मदत लागेल. भारतात सहा कोटी रिटेलर्स आहेत. त्यांना एकत्रित बांधण्यासाठी या ॲपचा निश्चितच उपयोग होईल. या ॲपनिर्मितीत सरकारने सहभागी झाल्यास त्याचा अजून फायदा होईल. या दृष्टीने चेंबरच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत.

# नाशिक पोस्ट विभागाला ८ पुरस्कार






**मुख्य पोस्ट मास्तर जनरल गणेश सावळेश्वरकर यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारतांना वरिष्ठ अधिक्षक मोहन अहिरराव दुसऱ्या छायाचित्रात तक्रार निरीक्षक मनिष देवरे, सहाय्यक अधीक्षक (मुख्यालय) विशाल निकम, नाशिक सिटी उपविभाग सहाय्यक अधिक्षक मनोज रूळे, नाशिक विभाग वरिष्ठ अधिक्षक मोहन अहिरराव, नाशिक पश्चिम उपविभाग सहाय्यक अधिक्षक संदिप पाटील, नाशिक दक्षिण उपविभाग डाक निरीक्षक भटु सुर्यवंशी.**

**नाशिक** : पोस्ट विभागाच्या ट्रेनिंग सेंटर येथे मुख्य पोस्ट मास्तर जनरल गणेश सावळेश्वरकर यांच्या अध्यक्षतेखाली डाक परिषद संपन्न झाली. या परिषदेत विभागीय क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारावर नाशिक विभागातील वरिष्ठ अधिक्षक मोहन अहिरराव व अधिकाऱ्यांना आठ पारितोषिके व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

मुख्य पोस्ट मास्तर जनरल गणेश सावळेश्वरकर यांनी मार्केटिंग कौशल्यावर मार्गदर्शन केले तसेच सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी असलेल्या योजना प्रभावीपणे पोहचविण्याचे आवाहन केले.

# GST New Era in 2022 :
## Important Changes effective 1st January 2022

1. Changes in GST impacting On E-Commerce Operators i.e.Zomato, Swiggy etc.:
   On September 17, it was decided at the Goods and Services Tax Council meeting that e-commerce operators be made liable to pay tax on services provided through them namely transport of passengers, by any type of motor vehicles- restaurant services provided, with some exceptions. This will become effective January 1, 2022, said a statement issued by the Finance Ministry after the GST Council meeting.

- You might already be aware that the government has given a directive via issued NN. 17/2021-Central Tax (Rate) dated 18thNovember 2021 wherein E-commerce platforms ("ECO") like Zomato, Swiggy are liable to pay tax on the restaurant services effective 1st January, 2022. The liability to pay taxes on the non-restaurant services as per this directive still lies with the restaurants themselves.
- Further Circular No. 167/23/2021-GST dated 17.11.2021 issued for clarification regarding modalities of compliance to the GST laws in respect of supply of restaurant service through ECO.
- ECO is now made liable to pay GST on "restaurant services" provided through the e-commerce platform.
- This change is not applicable for restaurant services provided from a premise with declared tariff of Rs. 7,500/- or above per day.
- Swiggy, Zomato qualifies etc. is qualify as an "e-commerce operator" under Section 2(45) of CGST Act, 2017.

**What is Restaurant and Non-Restaurant Services?**

As per NN.11/2017 – CTR, "Restaurant service means supply, by way of or as part of any service, of goods, being food or any other article for human consumption or any drink, provided by a restaurant, eating joint including mess, canteen, whether for consumption on or away from the premises where such food or any other article for human consumption or drink is supplied".
A restaurant is a place which is in the business of preparing and serving food in the premises or as takeaway.

An illustration under this category is provided below:

a) Restaurants located in a premise where declared tariff is not exceeding Rs. 7,500 per day and providing restaurant services.
b) Food and beverage sold as a part of restaurant services and which qualifies as restaurant services.
c) Cloud kitchens providing restaurant services etc.
d) Stand-alone restaurants which are not ice cream parlors or bakeries.

As per NN. 17/2021, Zomato, Swiggy shall be responsible for charging, collecting and paying GST @ 5% on supply of "restaurant services" made by such restaurant thru the ECO platform.

For Restaurant with No GSTIN, ECO will be responsible for charging, collecting, paying GST @5% on total order value.

Section 9(5) The Government may, on the recommendations of the Council, by notification, specify categories of services the tax on intra-State supplies of which shall be paid by the

electronic commerce operator if such services are supplied through it, and all the provisions of this Act shall apply to such electronic commerce operator as if he is the supplier liable for paying the tax in relation to the supply of such services.

NN. 17/2021

(iv) supply of restaurant service other than the services supplied by restaurant, eating joints etc. located at specified premises.

(c) specified premises means premises providing hotel accommodation service having declared tariff of any unit of accommodation above seven thousand five hundred rupees per unit per day or equivalent."

Schedule II of CGST Act, 2017- Clause 6 – Composite Supply

The following composite supplies shall be treated as a supply of services, namely:—

(a) works contract as defined in clause (119) of section 2; and

(b) supply, by way of or as part of any service or in any other manner whatsoever, of goods, being food or any other article for human consumption or any drink (other than alcoholic liquor for human consumption), where such supply or service is for cash, deferred payment or other valuable consideration.

1. If you operate or manage E-Commerce Platform, Whether TCS would be applicable? YES

2. If Suppliers making taxable supplies thru E-Commerce Operator, Whether TCS would be applicable? YES

3. Suppliers supplies Transportation of Passengers, housekeeping, and hotel accommodation services thru ECO, Whether TCS would be applicable? NO

4. Restaurant Service is provided from Specified Premises, Whether ECO would be liable for charging of tax? NO

5. Restaurant Service is provided from location other than Specified Premises, Whether ECO would be liable for charging of tax? YES

2. Recovery of Self-assessment tax without Opportunity of Difference between GSTR-1 and GSTR-3B :

- Section 75 (12) states that "Notwithstanding anything contained in section 73 or section 74, where any amount of self-assessed tax in accordance with a return furnished under section 39 remains unpaid, either wholly or partly, or any amount of interest payable on such tax remains unpaid, the same shall be recovered under the provisions of section 79."
- Explanation For the purposes of this sub section, the expression "self-assessed tax" shall include the tax payable in respect of details of outward supplies furnished under section 37 but not included in the return furnished under section 39.
- Earlier, Self-assessed taxes were to be determined on the basis of liabilities declared in Section 39.
- In pursuance of above, the tax payable in respect of invoices reported in GSTR-1 but not covered in GSTR 3B could not be recovered because it could not be considered as self-assessed tax.
- With this amendment, Difference between GSTR-3B and GSTR-1 may be recovered u/s 79 without any SCN u/s 74/75.

3. ITC available only When Supplier files his GSTR-1 and makes payment :

महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार

औरंगाबाद व इतर शहरांच्या हवाई मार्ग जोडण्यासाठी महाराष्ट्र चेंबर प्रयत्नशील असून ते लवकरात लवकर सुरू केले जाईल असे आश्वासन त्यांनी दिले.

येत्या कार्यकाळात होणाऱ्या कार्यक्रमांची माहीती नुतन अध्यक्ष सुरज डुमणे यांनी उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुहास लंके यांनी केले. तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय दुष्यंत आठावले यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार सचिव दत्तात्रय बेदडे यांनी मानले.

◆◆◆



औरंगाबाद इंडस्ट्रीज सप्लायर्स असो.च्या पदग्रहण समारंभप्रसंगी नुतन कार्यकारीणी पदाधिकारी यांच्या सोबत महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी

◆◆◆

# उद्योग क्षेत्राकडे दुर्लक्ष झाल्यास विकासाचा आलेख घसरेल - ललित गांधी

## दैनिक पुण्यनगरीला भेट

**औरंगाबाद** : शासन स्तरावर उद्योग क्षेत्राकडे दुर्लक्ष झाल्यास राज्याच्या विकासावर मोठा परिणाम होईल विकासाचा आलेख बेरोजगारांचे लोंढे व्यवस्थेसाठी बाजार त्यामुळे त्यासह प्रशासनात बसलेल्या व्यवस्थेने या बाबत विचार करण्याची वेळ आली आहे आपला महाराष्ट्र हा उद्योगांच्या प्रगतीबाबत देशात पहिल्या क्रमांकावर होता तो पाचव्या क्रमांकावर आला आहे ही चिंतेची बाब आहे असे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री ललित गांधी यांनी दैनिक पुण्यनगरीला दिलेल्या भेटीप्रसंगी व्यक्त केले.

याप्रसंगी शतक महोत्सवकडे वाटचाल करणाऱ्या राज्याच्या शिखर संस्थेचे नेतृत्व करण्याची संधी मिळणे ही दुर्मिळ व महत्त्वपूर्ण बाब आहे माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र सह चेंबरच्या कार्यक्षेत्रातील संबंधित व्यापार उद्योग कृषी व कृषिपूरक उद्योग व पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आपण कार्यरत राहू छोटे छोटे व्यापारी उद्योग तसेच महाराष्ट्र राज्य सरकार प्रयत्न करू असे सांगितले. कृषी प्रक्रिया क्लस्टर चे लाँचिंग शेतकरी शेतीशी निगडित व्यवसाय करणाऱ्यांसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने मोठे व्यासपीठ उभारले आहे अजून दोन हजार सत्तावीस एक भाग असलेल्या कृषी प्रक्रिया शनिवारी पुण्यनगरी कार्यालय अधिक कार्यकारी संपादक आहेत शहा यांच्या हस्ते लाँचिंग




**महाराष्ट्र चेंबरच्या 'व्हिजन २०२७' कृषि प्रक्रिया क्लस्टर च्या लोगो चे अनावर करताना पुण्यनगरी चे संपादक शहा, ललित गांधी, उमेश दाशरथी व इतर मान्यवर**

करण्यात आले कृषी प्रक्रिया क्लस्टर पहिल्या टप्प्यात नाशिक नागपूर लातूर सिंधुदुर्ग रायगड पालघर जळगाव कोल्हापूर सोलापूर गडचिरोली अकोला आणि ज्यांना जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.







# २०२६ पर्यंत कोल्हापूर राज्यातील सर्वात मोठे विकसित शहर : पालकमंत्री सतेज पाटील

## ‘व्हायब्रंट महाएक्स्पो २०२२’ प्रदर्शनाचे थाटात उद्‌घाटन

‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चर’, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्री व महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘व्हायब्रंट महाएक्सपो २०२२’ प्रदर्शन १५ ते १८ एप्रिल २०२२ दरम्यान शाहूपुरी मैदान कोल्हापूर येथे संपन्न झाले. प्रदर्शनात १०० च्यावर स्टॉलचा सहभाग होता व्यापारी, उद्योजक, नागरिकांकडून प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रदर्शनाचे उदघाटन पालकमंत्री सतेज पाटील, खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनात तिसऱ्या दिवशी २९ लाखांच्या अत्याधुनिक मशिनची विक्री झाली.

याप्रसंगी कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे, एम आयडीसीचे विभागीय अधिकारी राहुल भिंगारे, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, करुणाकर शेट्टी, महाराष्ट्र चेंबरच्या विश्‍वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, रिलायन्स इंडस्ट्रीज लि. पुणेचे सत्यजित भोसले, रामसा क्रेन्स प्रा. लि. चे सीईओ सदाशिव बरगे, महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिलचे अध्यक्ष रवी बोराटकर यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी उपस्थितांचे स्वागत केले व राज्यातील व्यापार, उद्योगांच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर विविध उपक्रम राबविण्यात येतात. व्हायब्रंट महाएक्सपो २०२२ प्रदर्शन हा त्याचाच एक भाग असून या महा एक्सपो मुळे राज्यातील व्यापार उद्योगाला चालना मिळेल. चांगली बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असून हे ९ वे प्रदर्शन असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच चार दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात नवनवीन तंत्रज्ञान व यंत्रांची माहिती होणार आहे तसेच महत्वाच्या विषयावर तज्ञ मार्गदर्शन करणार असून सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा असे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले.

पालकमंत्री सतेज पाटील शेती आणि दूध यावर जिल्ह्याचे अर्थकारण चालते तर उद्योग क्षेत्राच्या निर्यातीमध्ये कोल्हापूर जिल्हा देशात सातव्या क्रमांकावर आहे त्यामुळे जिल्ह्याच्या उद्योग क्षेत्राला अधिक चालना देण्यासाठी करवीर तालुक्यातील हल्सवडे येथे नवीन औद्योगिक वसाहत उभी करण्याचा विचार सुरू असल्याचे पालकमंत्री सतेज पाटील यांनी सांगितले तसेच २०२६ पर्यंत पुण्यानंतर कोल्हापूर राज्यातील मोठे विकसित शहर असेल असा विश्‍वास त्यांनी व्यक्त केला करुणा नंतर जिल्ह्याच्या अर्थकारणाची चक्रे फिरू लागली नवीन तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी एक प्रदर्शन एक माध्यम ठरत आहे जिल्ह्यात २७० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याने करवीर तालुक्यातील हल्सवडे येथे नवीन औद्योगिक वसाहत उभा करण्याचा विचार आहे पश्‍चिम महाराष्ट्राला मूलभूत सुविधा कशा देता येतील यासाठी प्रयत्नशील आहोत २०२६ पर्यंत कोल्हापूर कोकण व पश्‍चिम महाराष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे आमदार चंद्रकांत जाधव यांना यांनी यासाठी डीपीआर तयार केला होता त्यामुळेच विकासाच्या डेस्टिनेशन सोलापूरच्या माध्यमातून प्रयत्न केला पाहिजे विकासासाठी सर्वांनी एकत्र बसून चर्चा करू अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली तिसरी पिढी आपल्याला सांभाळावी लागणार आहे अन्यथा पेन्शनरांचे शहर म्हणून कोल्हापूरची ओळख होईल याप्रसंगी म्हणाले औद्योगिक गती वाढविण्यासाठी सहकार्य असल्याशिवाय कोणत्याही गोष्टी साध्य होत नाही त्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे आभार प्रदर्शन करूनाकर शेट्टी यांनी केले तर सूत्रसंचालन ताज मुलाणी यांनी केले प्रदर्शनास कोल्हापूर, सांगली, सातारा, कोकण, सोलापूर आदी ठिकाणच्या व्यापारी, उद्योजक, विद्यार्थी व नागरिकांनी भेट दिली.



‘व्हायब्रंट महाएक्स्पो २०२२ ’ प्रदर्शनाचे फीत कापूर उद्‌घाटन करताना पालकमंत्री सतेज पाटील, खा. संजय मंडलिक, खा. धैर्यशील माने, ललित गांधी, संजय शेटे व अन्य संचालक.





प्रदर्शनात मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व पालकमंत्री सतेज पाटील समवेत व्यासपीठावर मान्यवर

# महाराष्ट्राचे अमेरीकेत ब्रँडिंग ; ऑगस्टमध्ये बिझनेस समिट आयोजन

**औरंगाबाद** : अमेरीकेत स्थायिक झालेले भारतीय आणि अमेरीकेतील उद्योगांनी महाराष्ट्रात येऊन उद्योग थाटावेत, यासाठी सरकारची मदत न घेता प्रथमच ब्रँडिंग केले जाणार आहे. 'महाराष्ट्र चेंबर ऑफ इंडस्ट्री अँड अँग्रीकल्चर' हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविणार आहे. ११ ते १४ ऑगस्ट हा उपक्रम राबविला जाईल.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले की, उद्योग, व्यवसायात देशातील सर्वांत प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राची जगभर ओळख आहे. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, नाशिकसह राज्यातील अनेक मोठया शहरांतील उद्योगनगरींमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय उद्योगांचे जाळे पसरले आहे. उद्योग व्यवसायातील महाराष्ट्राची ही ओळख कायम अव्वल राहावी यासाठी सर्व पातळयावंर प्रयत्न केले जातात. त्यात आम्ही महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून यंदा एक अभिनव उपक्रम राबविणार आहोत. अमेरीकेत स्थायिक झालेले भारतीय आणि अमेरीकेतील उद्योगांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी निमंत्रित करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. ११ ते १४ ऑगस्ट दरम्यान आम्ही अमेरीकेतील विविध प्रांतांमध्ये जाऊन महाराष्ट्राचे ब्रँडिंग करणार आहोत.

अमेरीकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळ, महाराष्ट्र मंडळ यांच्या मदतीने हा उपक्रम राबविला जाईल. तीन दिवस अमेरिकेतील विविध प्रांतांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्यातील १०० उद्योजक आमच्यासोबत येणार आहेत. अमेरीकेतून थेट महाराष्ट्रात गुंतवणूक व्हावी. व्यवसाय, उद्योग अधिक वाढीस लागावेत असा आमचा या मागचा हेतू आहे.

### ई कॉमर्स धोरणात बदल आवश्यक

केंद्र सरकारचे इ कॉमर्सबाबात जे धोरण निश्चित केले आहे. त्यात देशातील व्यापारी, उद्योजकांसाठी अनेक अडचणीचे मुद्दे आहेत. तंत्रज्ञानाची कास धरली पाहिजे याबाबत दुमत नाही मात्र, त्याचा स्थानिक उद्योजक, व्यापाऱ्यांना फटका बसू नये. बहुराष्ट्रीय आणि राष्ट्रीय उद्योग, व्यापाऱ्यांना समान धोरण असले पाहिजे. तसे नसल्याने गेल्या पाच वर्षांत देशातील ३० टक्के छोटे व्यवसाय, उद्योग बंद पडले. ई कॉमर्समुळे बेरोजगारीमध्ये भर पडली आहे. असे चित्र असू नये, यासाठी आम्ही केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन, ई कॉमर्स धोरणात बदल करण्याबाबत मागणी केली आहे, असे गांधी यांनी सांगितले.

◆◆◆

# देशात एकसमान वीज दर हवेत

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांची मागणी

औरंगाबादः देशात सर्वांत महाग वीज महाराष्ट्रात आहे. सध्या विजेची समस्या मोठया प्रमाणावर भेडसावत आहे. सद्यस्थितीत सुरू असलेले उद्योग बंद पडण्याची भीती आहे. जसे उद्योगांसाठी 'वन नेशन वन टॅक्स' केले गेले. तशीच पध्दत वीजदराबाबत राबवली पाहिजे. अशी मागणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केली.

श्री. ललित गांधी नुकतेच औरंगाबादेत आले होते. या भटीरदम्यान त्यांनी 'महाराष्ट्र टाइम्स' शी संवाद साधला. उद्योग, व्यापार, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय धोरण यासह विविध विषयांवर त्यांनी विवेचन केले.

ते म्हणाले की, उद्योग व व्यापार क्षेत्रातून विविध करांपोटी कोटयावधी रुपयांचा महसूल सरकारला मिळतो. या अनुषंगाने सुविधा पुरविण्यात मात्र सरकारकडून अपेक्षित पावले उचलली जात नाहीत. सध्या राज्यात विजेचे संकट आहे. महाराष्ट्रात अन्य राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक वीजदर महाराष्ट्रात आहेत. वीजदर , वीजसंकटामुळे अनेक उद्योग बंद पडण्याची भीती आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने वन नेशन वन टेरिफ ही पध्दती राबविण्याची गरज आहे.

◆◆◆

# अभूतपूर्व प्रतिसादात वास्तू २०२२ प्रदर्शनाचा समारोप

## बांधकाम क्षेत्रात बुस्टर डोस मिळाला : ललित गांधी






आयकॉन स्टील प्रायोजीत वास्तू २०२२ कार्यक्रमांत लकी ड्रॉमधील विजेता पुंडलीक कारंडे यांना ई- बाईक प्रदान करतांना चेंबर ऑफ कॉमर्सचे ललित गांधी यांच्यासह वास्तू कमिटी चेअरमन नितीन धूत व अयोजक समितीचे पदाधिकारी.

**इचलकरंजी** : पश्चिम महाराष्ट्र प्रथमच मोठया प्रमाणात मँचेस्टर नगरीत आयकॉत स्टील प्रायोजीत वास्तू २०२२ हे प्रदर्शन यशस्वीपणे आयोजीत करण्यात आले. या प्रदर्शनामुळे बांधकाम क्षेत्राला एक प्रकारे बुस्टर डोस मिळाला आहे. विविध सहा संघटनांनी अल्पावधीत हे प्रदर्शन आयोजीत करून एक आदर्श निर्माण केला आहे. आता शहरातील आद्यौगिक, व्यापारी संघटनांची एक व्यापक बैठक घ्यावी. त्यांच्यासाठी चेंबर ऑफ कॉमर्सचे एक फॅसिलीटी सेंटर इचलकरंजीत सुरू करण्यात येईल, अशी महत्वपूर्ण घोषणा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज, मुंबईचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केली.

येथील केएटीपी ग्राऊंडवर क्रेडाई - इचलकरंजी, बिल्डर्स असोसिएशन - इचलकरंजी, इंजिनिअर्स ॲन्ड आर्किटेक्ट असोसिएशन, सिमेंट डीलर वेल्फेअर असोसिएशन, बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स असोसिएशन, बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन, यांच्या संयुक्त विद्यमाने वास्तू २०२२ हे प्रदर्शन आयोजीत करण्यात आले होते. अभूतपूर्व प्रतिसादात या प्रदर्शनाचा सोमवारी समारोप झाला. याप्रसंगी श्री. गांधी बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्षा सौ. अलका स्वामी, हुपरींच्या नगराध्यक्षा सौ. जयश्री गाट यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थीती होती.

यावेळी काढण्यात आलेल्या लकी ड्रॉमध्ये इलेक्ट्रीक बाईकचे बक्षीस सेंट्रींग कॉन्ट्रॅक्टर पुंडलीक सिताराम कारंडे या भाग्यवान विजेत्यास लागले. तर टीव्ही संचचे बक्षिस फरशी फिटींग कॉन्ट्रॅक्टर शंकर शहाजी कांबळे यांना लागले. यासह विविध बक्षिसाचे मानकरी ठरलेल्या सर्वांना समारोप कार्यक्रमांत या वस्तूंचे वितरण करण्यात आले.

प्रास्तविक वास्तू कमिटी चेअरमन नितीन धूत यांनी केले. प्रदर्शन दरम्यान, माजी आमदार तथा भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर व प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारणी सदस्य मदन कारंडे, काँग्रेसचे राहूल खंजीरे, माजी नगराध्यक्ष हिंदूराव शेळके, भाजपचे शहराध्यक्ष अनिल डाळया यांच्याहस्ते लकी ड्रॉ काढण्यात आले. यामध्ये खासदार धैर्यशील माने, पोलीस उप अधिक्षक बी.बी महामुनी, वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोक स्वामी यांच्यासह बांधकाम क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी भेट दिली. सुत्रसंचालन नंदकुमार शहा यांनी केले. आभार मयूर शहा यांनी मानले.

विवेक सावंत, संजय रुग्गे, मयूर शहा, अनिल मनवाणी, संदीप जाधव, बळिराम घायतिडक, रमेश मर्दा, विकास चंगेडिया, फैयाज गैबान, सुधाकर झोले, तानाजी हराळे, शितल काजवे, मोहित गांधी, प्रितिश शहा, घनशाम सावलानी, महांतेश कोकळकी, सुहास अकिवाटे, सय्यद गफारी, अभय पिसे, सचिन बोरा, मुकुंद ओझा, नंदकुमार शहा, विठ्ठल तोडकर, राजू पाटील, राजेंद्र खंडेराजुरी, गजानन ढवळे, महेश महाजन, जहीर सौदागर, पन्नालाल डाळया, कुमार माळी, नारायण हुंद्रे, अक्षय सातपूते, राहूल निकम, सुधील लाटकर, भगवान कांबळे, शिवाजी पवार यांनी प्रर्दशन आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# मुंबईत राजर्षी शाहू स्मारक भवन उभारु : मंत्री आदित्य ठाकरेंची घोषणा : खेतवाडीतील राजर्षी शाहु स्मृतिस्तंभाचे उद्घाटन




मुंबई खेतवाडी येथे राजर्षी शाहू स्मृती शताब्दी वर्षानिमित्त उभारलेल्या स्मृतिस्तंभाच्या उद्घाटनप्रसंगी ना. आदित्य ठाकरे, ना. हसन मुश्रीफ, मा. मालोजीराजे, मा. राजेश क्षीरसागर, खा. अनिल देसाई, मा. ललित गांधी, मा. वसंतराव मुळीक आदि.

**मुंबई** : राजर्षी शाहू महाराजांचे विचार आणि वारसा जपण्यासाठी मुंबईत लोकराजाचे स्मारक आणि संग्रहालय उभारण्याची घोषणा पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी आयोजित राजर्षी शाहू स्मूती शताब्दी वर्षानिमित्त उभारलेल्या स्मृतिस्तंभाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. वरळी येथे कोल्हापूर भवन उभारण्याची घोषणा केली. अध्यक्षस्थानी मालोजीराजे छत्रपती तर ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ प्रमुख उपस्थित होते. खेतवाडीतील गल्ली क्रमांक १३ येथील पन्हाळा लॉज ज्या ठिकाणी होते, तेथे १२ फुटांचा स्मृतिस्तंभ उभारला असून त्याचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाले.

श्री. ठाकरे म्हणाले, ''राजर्षी शाहू महाराज आणि माझे पणजोबा प्रबोधनकार ठाकरे यांची मैत्री होती. १०० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी राजर्षीची आणि त्यांची भेट झाली होती. १०० वर्षांनंतर मला या कार्यक्रमाला उपस्थित राहायची संधी मिळतेय ही भाग्याची गोष्ट आहे. १०० वर्षांनी राजर्षीची आठवण काढण्यासारखे कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या कार्याला सलाम करण्यासाठी शाहू स्मतिशताब्दी समितीचे सदस्य मला भेटले. त्यांनी स्मृतिस्तंभाची कल्पना मांडली. पालिकेच्या अधिकाऱ्यांनी ही संकल्पना मूर्त स्वरुपात आणली. शाहू महाराजांचे निधन खेतेवाडीतील पन्हाळा लॉजवर झाले. त्यांची स्मृती येथे असावी, अशी शाहूप्रेमींची अपेक्षा आहे. हीच अपेक्षा मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांचीही आहे''

ग्रामविकास मंत्री मुश्रीफ म्हणाले, ''राजर्षी शाहूंनी केवळ संस्थानापुरता विचार केला नाही, तर संपूर्ण देशाला दिशा दिली. त्यांचा देहान्त झाला त्या ठिकाणी स्तंभ उभारत आहे, ही समाधानाची बाब आहे''

मालोजीराजे छत्रपती म्हणाले, ''स्मृतिशताब्दी वर्षात जेथे त्यांचा देहान्त झाला तेथे स्मृतिस्तंभ असावा अशी शाहूप्रमींची अपेक्षा होती. यानिमित्त आदित्य ठाकरे यांना विनंती केली. त्यांनी संकल्पना उचलून धरली आणि मुंबईत हे काम पूर्णत्वाला गेले.''



शाहीर दिलीप सावंत यांच्यासह पथकाने पोवाडा सादर केला. दरम्यान, १०० सेकंद स्तब्ध उभे राहून राजर्षी शाहूंना आदरांजली वाहिली. राजेश क्षीरसागर, खासदार अनिल देसाई, चंद्रदीप नरके, वसंतराव मुळीक, चंद्रकांत पाटील, बबनराव रानगे, अवधूत पाटील, श्रध्दा जाधव उपस्थित होते.

# औरंगाबाद लोकमत भवनला सदिच्छा भेट..




महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी आणि शिष्टमंडळाने लोकमत भवनला भेट दिली. याप्रसंगी लोकमतचे चेअरमन राजेंद्र दर्डा यांनी स्वागत केले व अध्यक्ष ललित गांधी यांना 'माझी भिंत' या माझ्या पुस्तकाची प्रत भेट दिली. याप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली व भविष्यातील उपक्रमांची माहिती दिली. तसेच राज्यातील उद्योग, व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चांगली चर्चा झाली. राजेंद्र दर्डा यांच्या उद्योग मंत्रीपदाच्या कार्यकाळातीत कार्याचा राज्याच्या विकासात मोलाचा वाटा असल्याचे ललित गांधी यांनी विशेषत्वाने नमुद केले.




महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्री.(Maccia) व 'एक्सपो इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने डिसेंबर २०२२ मध्ये मुंबई येथे आयोजित Maharashtra International Trade Expo- MITEX या भव्य एक्सपोच्या कामकाजास दि.२२ एप्रिल २०२२ पासून चेंबरच्या मुंबई मुख्यालय येथे करारावर सह्या करून प्रारंभ करण्यात आला.
महाराष्ट्र चेंबर तर्फे अध्यक्ष या नात्याने ललित गांधी यांनी व एक्स्पो इंडिया तर्फे जावेद शेख यांनी या करारावर सह्या केल्या. यावेळी सागर नागरे तसेच एक्स्पो इंडिया चे अन्य अधिकारी उपस्थित होते.

## स्वागत आहे एक्सपर्ट कमिटीच्या नवीन पदाधिकाऱ्यांचे



**प्रितेश चॅटर्जी**
चेअरमन
सिव्हिल एव्हिएशन समिती



**श्रीकृष्ण परब**
को-चेअरमन
सिव्हिल एव्हिएशन समिती



**ॲड. देवदत्त पलोडकर**
को-चेअरमन
आरबिट्रेशन ॲण्ड मेडिएशन समिती



**श्रीमती बिंदा कन्यालकर**
ठाणे संपर्क केंद्र प्रमुख

# जैन समाजाचा 'कॅन्सर मुक्त भारत' प्रकल्प गौरवास्पद - केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर

## हिमाचलचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी ६०० व्या शिबिराचे उद्घाटन केले






जैन महासंघाच्या ६०० व्या शिबिराचे उद्‌घाटन करताना महामहिम राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, ललित गांधी. दुसऱ्या छायाचित्रात ललित गांधी यांचा सत्कार करताना महामहिम राज्यपाल राजेंद्र आर्लेकर व केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर.

**उना (हिमाचल प्रदेश)** : 'अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाचे' वतीने अत्याधुनिक मोबाईल बस च्या माध्यमातून चालवला जाणारा कॅन्सर मुक्त भारत हा प्रकल्प गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन केंद्रीय माहिती प्रसारण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री अनुराग ठाकूर यांनी केले.

जैन महासंघाचे वतीने चालवल्या जाणाऱ्या 'कॅन्सर मुक्त भारत' अभियानांतर्गत ६०० व्या मोफत तपासणी शिबिराचे उद्‌घाटन हिमाचल प्रदेशातील उना येथे महामहिम राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, अनुराग ठाकूर व महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते संपन्न झाले त्याप्रसंगी ते बोलत होते.

क्रिडा मंत्री अनुराग ठाकूर यांनी जैन समाजाने गेल्या ७ वर्षात ६०० मोफत शिबिरांचे आयोजन करून दीड लाखाहून अधिक लोकांची कॅन्सर तपासणी केली हे कार्य हिमालयासारखे मोठे असल्याचे सांगून ६०० वे शिबीर हिमालयातील दुर्गम भागात आयोजित केल्याबद्दल महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचा यासाठी विशेष गौरव करत असल्याचे सांगितले.

महामहिम राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी कॅन्सर तपासणीच्या पुरेशा सुविधा नसलेल्या हिमाचल सारख्या राज्यापर्यंत पोहोचणे अभिनंदनीय असल्याचे सांगितले.

जैन समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी जैन समाजातर्फे भारत भर राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

शनिवार १६ एप्रिल २०२२ रोजी हिमाचल मध्ये सुरू केलेल्या अभियानांतर्गत २२ एप्रिल पर्यंत ७ गावांत शिबिरांचे आयोजन केले असून या माध्यमातून २००० महिलांच्या कॅन्सर तपासणी केल्याचे ललित गांधी यानी सांगितले.

# महाद्वार रोड कोल्हापूरचे भूषण

## ललित गांधी : व्यापारी व रहिवासी असोसिएशन तर्फे अनोखा कृतज्ञता सोहळा







**महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष माननीय ललित जी गांधी यांची महाराष्ट्र चेंबर अध्यक्षपदी निवड झाल्याद्दल महाद्वार रोड व्यापारी व रहिवासी असोसिएशन सन्मानपत्र पुरस्कार वितरण सोहळ्याचे औचित्य साधून सत्कार करण्यात आला यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष शामराव जोशी व उपाध्यक्ष महेश उरसाल व कोल्हापूर सराफ व्यापारी संघ अध्यक्ष राजेश राठोड व कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे.**

कोल्हापूरः समाजातील सर्वच घटकांना सामावून घेणारा महाव्दार रोड कोल्हापूरचे भूषण आहे. याच रोडवर मी माझ्या व्यवसायाची सुरुवात केली आणि पुढे विविध व्यवसायात आलो. सध्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचा अध्यक्ष असलो तरी मी महाव्दार रोडवरचा एक घटक असल्याचा अभिमान नक्कीच आहे, असे मत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केले. निमित्त होते, महाव्दार रोड व्यापारी व रहिवासी असोसिएशन तर्फे आयोजित सन्मानपत्र वितरण सोहळ्याचे. या परिसराचा लौकिक वाढवणाऱ्या व्यक्तींचा या कार्यक्रमात सन्मान झाला. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष शामराव जोशी होते.

अनेक मोठी शोरूम आता इथे उभी राहिली आहे. इथले काही फेरीवालेही प्रत्येक वर्षी न चुकता आयकर भरतात. एकूणच या रोडच्या अवती भवतीचा परिसर म्हणजे कोल्हापूरची प्रमुख बाजारपेठ. दहा ते बारा हजारांहून अधिक कुटुंबांची उदरनिर्वाह याच बाजारपेठेवर अवलंबून आहे. साहजिकच याच महाव्दार रोड प्रती या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनोख्या पद्धतीने कृतज्ञता व्यक्त झाली. ललित गांधी यांच्यासह कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, सराफ संघ अध्यक्ष राजेश राठोड यांच्या हस्ते सत्कार झाले.

तृषाशांती कोल्ड्रिंक हाऊसचे भगवानराव पोवार, लाटकर पंचांग कर्ते मेघःश्याम लाटकर, करवीर क्रिएशन्सचे ग्यानचंद नैनवाणी, प्रफुल्ल जोशी, पुष्पम चिल्ड्रेन वेअरचे कांतिलाल निसर, अँड.पी.बी. नरवणकर, प्रज्ञा क्लासेसचे रविचंद्र निगवेकर, वणकुद्रे भांडी दुकानचे सुरेश वणकुद्रे, कटके परफ्युसचे शरद कटके, ड्रेसलँडचे पीयुष सत्रा, डी.डी. शेटे अँड सन्सचे विलास शेटे आदींचा कार्यक्रमात सन्मानपत्र देऊन गौरव झाला. असोसिएशनचे उपाध्यक्ष महेश उरसाल यांनी स्वागत केले. कार्याध्यक्ष रामेश्वर पतकी यांनी प्रास्तविक केले. सचिव डॉ. गुरूदत्त यांनी आभार मानले.

# वस्त्रोद्योग समितीच्या चेअरमनपदी आम. प्रकाश आवाडे, महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमनपदी कांतीलाल चोपडा

## कार्यकारिणी सभेत अध्यक्ष ललित गांधी यांच्याद्वारे नियुक्ती जाहीर





**महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमनपदी नाशिकचे प्रसिद्ध उद्योजक कांतीलाल चोपडा यांच्या नियुक्तीची घोषणा करतांना अध्यक्ष ललित गांधी, आमदार व माजी वस्त्रोउद्योगमंत्री प्रकाश आवाडे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र स्वीकारतांना कांतीलाल चोपडा, समवेत उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी दुसऱ्या छायाचित्रात आम. प्रकाश आवाडे यांना वस्त्रोउद्योग समिती च्या चेअरमन पदाचे नियुक्ति पत्र देताना अध्यक्ष ललित गांधी सोबत नितिन धुत, प्रदिपभाई कापडीया, जयेश ओसवाल.**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रिकल्चरच्या मुंबई येथे झालेल्या ५ व्या कार्यकारणी सभेत उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमनपदी नाशिकचे प्रसिद्ध उद्योजक कांतीलाल चोपडा यांची अध्यक्ष ललित गांधी यांनी नियुक्ती केली. आमदार व माजी वस्त्रोउद्योगमंत्री प्रकाश आवाडे यांच्या हस्ते कांतीलाल चोपडा यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

याप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून वस्त्रोउद्योगाकरीता भरीव कार्य करण्याचे आयोजिले असून वस्त्रोउद्योग समितीवर आमदार प्रकाश आवाडे यांची चेअरमनपदी निवड केल्याचे सांगितले.

तसेच अॅग्रिकल्चर, फूड प्रोसेसिंग समितीच्या को-चेअरमनपदी मयांक गुप्ता, ठाणे संपर्क केंद्राच्या चेअरमनपदी श्रीमती बिंदा कन्यालकर, सिव्हिल एव्हिएशन समितीच्या चेअरमनपदी श्री. प्रितेश चॅटर्जी, को-चेअरमनपदी श्री. श्रीकृष्ण परब, आरबिटेशन अॅण्ड मेडिएशन समितीच्या को-चेअरमनपदी श्री. देवदत्त पलोडकर यांची नियुक्ती केली. अध्यक्ष ललित गांधी यांनी कार्यकारिणी समिती तसेच विविध तज्ञ समितीवर नवीन व त्या त्या विषयातील तज्ञ उमेदवारांना संधी दिल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र चेंबरचे कार्य राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पोहोचवावे, स्थानिक व्यापारी, औद्योगीक संघटनाशी समन्वय करावा, येत्या २ वर्षात कृषी, महिला व उत्पादणाधारित क्लस्टर उभारण्यात येणार असून महाराष्ट्र चेंबरचे राज्यातील व्यापार उद्योग, कृषी क्षेत्रासाठीचे व्हिजन सांगितले व नियुक्त केलेल्या मान्यवरांना समितीचे काम करण्याबाबत मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.



**आमदार व माजी वस्त्रोउद्योगमंत्री प्रकाश आवाडे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र स्वीकारतांना अॅग्रिकल्चर, फूड प्रोसेसिंग समितीचे को-चेअरमन मयांक गुप्ता सोबत समवेत उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, सुधाकर देशमुख, रवींद्र माणगावे, सौ. शुभांगी तिरोडकर.**

याप्रसंगी उत्तर महाराष्ट्र नाशिक शाखा चेअरमन कांतीलाल चोपडा यांनी अध्यक्ष ललित गांधी यांनी दिलेली जबाबदारी मोठी असून उत्तर महाराष्ट्र विभागातील व्यापार, उद्योग व कृषि क्षेत्रासाठी विविध उपक्रम आयोजित करून भरीव कार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच टेक्सटाईल समितीचे चेअरमन आमदार प्रकाश आवाडे यांनी वस्त्रोउद्योग क्षेत्रासाठी विविध उपक्रम राबवून विकास करण्याचे आश्वासन दिले. अग्रिकल्चर, फूड प्रोसेसिंग समितीचे को-चेअरमन मयांक गुप्ता यांनीही कृषी क्षेत्राच्या विकासासाठी समितीच्या माध्यमातून विविध उपक्रम आयोजित करून उत्कृष्ट कार्य करण्याचे आश्वासन दिले.

याप्रसंगी उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उपाध्यक्ष सौ. शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष करूनाकर शेट्टी, उपाध्यक्ष रवींद्र मानगावे, उपाध्यक्ष तनसुख झांबड, सरकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते.

# कोल्हापुरात गूळ क्लस्टर उभारणार

# ललित गांधी : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स पुढाकार घेणार

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा कोल्हापूर येथे नागरी सत्कार संपन्न





कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित नागरी सत्कारप्रसंगी दिपप्रज्वलन करताना ललित गांधी श्रीमंत छत्रपति शाहु महाराज, आमदार जयश्री जाधव, प्रदिपभाई कापडीया, आनंद माने, संजय शेटे दुसऱ्या छायाचित्रात समारंभास मार्गदर्शन करताना ललित गांधी

**कोल्हापूर** : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज आणि शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून कोल्हापुरात सहा महिन्यांत गूळ क्लस्टर उभारण्यात येईल. 'चेंबर'तर्फे ३६ जिल्ह्यांच्या डेव्हलपमेंट फोरमची स्थापना करून त्याद्वारे या जिल्ह्यांच्या विकासाचा रोडमॅप तयार केला जाईल. त्याच्या अंमलबजावणीसाठी सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असल्याचे 'महाराष्ट्र चेंबर' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी कोल्हापूर येथे सांगितले.

आमदारपदी निवडून आल्याबद्दल जयश्री जाधव आणि 'महाराष्ट्र चेंबर'च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ललित गांधी यांचा सत्कार कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजतर्फे आयोजित कार्यक्रमात शाहू छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आला. शाहू स्मारक भवनातील सत्काराला उत्तर देताना गांधी बोलत होते. कोल्हापूर शहराच्या सर्वांगीण विकासासह उद्योजक, व्यवसायांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करण्याची ग्वाही आमदार जाधव यांनी दिली.

श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या मार्गदर्शन पर भाषणातून महाराष्ट्र चेंबर चा गौरव केला व ललित गांधी यांच्या राष्ट्रीय स्तरापर्यंत असलेल्या संपर्काचा राज्याला फायदा होईल असा विश्वास व्यक्त केला.

थेट पंतप्रधानांपर्यंत संपर्क असलेल्या कोल्हापूर च्या सुपुत्राला मिळालेली संधी सर्वांसाठी अभिमानाची असल्याचे सांगितले.




कोल्हापूर च्या पहिल्या महिला आमदार जयश्री जाधव यांचा सत्कार करताना श्रीमंत छत्रपति शाहु महाराज सोबत ललित गांधी.

कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व संलग्न व्यापारी उद्योग संघटनांनी एकत्र येऊन आयोजित केलेल्या या समारंभाला जिल्ह्यातील व्यापारी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'महाराष्ट्र चेंबर'च्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी निवड झाल्याबद्दल संजय शेटे, धनंजय दुग्गे, संजय पाटील, गोरख माळी, जयेश ओसवाल, सीमा शहा आणि 'ग्रेन मर्चंटस'च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वैभव सावर्डेकर यांचा सत्कार करण्यात आला. 'कोल्हापूर चेंबर'चे अध्यक्ष संजय शेटे यांनी स्वागत केले. माजी अध्यक्ष आनंद माने यांनी प्रास्ताविक केले. संचालक तौफिक मुल्लाणी यांनी सूत्रसंचालन केले. शिवाजीराव पोवार यांनी आभार मानले.

# उत्तर महाराष्ट्र विकाससंधी, थोडा हैं थोडे की जरूरत हैं ।






**संजय सोनवणे**
(को-चेअरमन, नाशिक शाखा)

दोन राज्यांच्या सीमांवर वसलेला बहिणाबाई चौधरी, वि. वा. शिरवाडकर, बालकवी ठोंबरे अशा थोर साहित्यकार, शून्याचा शोध ज्यांनी ला-वला त्या भास्कराचार्य यांची जन्मभूमी तसेच द्राक्ष, केळी अशा कृषी उत्पादनात भारतात नावाजलेला हा भूभाग जो पूर्वापार खान्देश म्हणून ओळखला जातो. यासाठी खुप मोठ्या विकास संधी खर तर उपलब्ध आहेत. नुकत्याच महाराष्ट्र चेंबर उत्तर महाराष्ट्र शाखा सुवर्ण महोत्सव वर्षारंभ निमित्ताने नाशिकमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात या क्षेत्रासाठी विकाससंधी यासाठी शासन स्तरावर करावयाचा पाठपुरावा या विषयावर अतिशय चांगली चर्चा झाली. यात प्रामुख्याने खालील विषयासंबंधी चर्चा झाली.

**कृषी** : नाशिक जिल्हा आणि बहुतांश तालुके यात द्राक्ष, डाळिंब, कांदा, भाजीपाला या उत्पन्नात हा अतिशय प्रगत म्हणून संपूर्ण भारतात प्रसिध्द आहे. कृषी माल निर्यात करण्यात उत्तर महाराष्ट्राचा वाटा हा संपूर्ण देशाच्या तुलनेत इतका मोठा आहे. यात द्राक्ष ८८ %, केळी ३८%, डाळिंब ६०%, मनुका ८२%, कांदा ६२ % असावाटा आहे.

या निर्यातीच्या वाढीसाठी नाशिकमध्ये कृषीमाल पुरवठा आणि एक्सपोर्ट टर्मिनल अधिक कार्यक्षम करणे आवश्यक आहे. तसेचप्रत्येक तालुका स्तरावर कोल्ड स्टोरेज, सोर्टिंग, ग्रेडिंग, पॅकेजिंग यासाठी क्लस्टरची निर्मिती करणे गरजेचे आहे. यामुळे सर्व कृषी उत्पादन हे कमीत कमी वेळेत जगभर पोहचवता येतील यातून कृषी मालाला अधिक चांगला भाव मिळेल.

कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत कोल्डस्टोरेज तसेच कृषी माल प्रक्रिया केंद्र जर कार्यान्वित झाले तर अनेकदा कृषी मालहा भाव नसल्यामुळे फेकून दिला जातो त्यावर प्रक्रिया करूनतो मागणी आणि पुरवठा याची सांगड घालण्यासाठी उपयोगी ठरेल.

या विभागातील कृषीमाल हा देशात विविध ठिकाणी गतीने पोहचण्यासाठी इन्सुलेटेड वॅगनरॅक हे रेल्वेमार्फत उपलब्ध करणे गरजेचे आहे.

उत्तर महाराष्ट्र प्रामुख्याने गोदावरी, दारणा, तापी, पिंजाल, नर्मदा अशा नद्या आहेत यातील गोदावरी, दारणा या नद्यांचे शिवाय इतरपाणी हे गुजरातमार्गे समुद्रात जाऊन मिळते यासाठी अतिरिक्त पाणी हे नदीजोड प्रकल्पाच्या धर्तीवर इतर छोट्या नदया या जोडण्यासंबंधी योजना आखणे गरजेचे आहे.

**उद्योग** : नाशिक वगळता मोठे उद्योग खान्देश विभागात आलेले नाहीत वास्तविक जागा, पाणी, कुशल मनुष्यबळ, दोन जवळच असलेले राज्य यांची सीमा महामार्ग हे सर्व आवश्यक असे पोषक वातावरण असूनही मोठे उद्योग या विभागात आले नाहीत. मुंबई, पुणे, वापी, सिलवासा, सूरत, बडोदा, इंदोरही औद्योगिक शहरेहीकेवळ १०० ते २५० किलोमीटर च्या परिघात आहेत. महाराष्ट्रातील औद्योगिक क्रांतीही फक्त मुंबई, पुणे, ठाणे, औरंगाबाद या शहरांपुरती मर्यादित झालीआहे.

येथूनपुढे शासनामार्फत सिलवासा आणि बड्डीच्या धर्तीवर धुळे, जळगाव या जिल्ह्यासाठी स्पेशलइ कॉनॉमिक झोन बनवून नवे उद्योग यावे यासाठी धोरण आखणे गरजेचे आहे.

मालेगाव, येवला ही वस्त्र उद्योगातील नामांकित शहरे येथे टेक्सटाईल क्लस्टरची निर्मिती होणे अपेक्षित आहे. आयटी

उद्योगासाठी आवश्यक असे सर्व पोषक वातावरण नाशिकमध्ये उपलब्ध आहे. यासाठी शासनामार्फत प्रोत्साहन योजना या विभागासाठी लागू करणे अपेक्षित आहे.

**पर्यटन** : या क्षेत्रासाठी असंख्य विविध पर्याय संपूर्ण उत्तर महाराष्ट्र विभागात उपलब्ध आहेत. या मध्य धार्मिक तिर्थक्षेत्र  नाशिक, त्र्यंबक, शिर्डी, सप्तश्रृंगीदेवी, सारंगखेडा, प्रकाशा, पाटणादेवी, नस्तनपूर, मनमाड येथील शिखांचे धर्मस्थळ गुरूद्वारा, मांगीतुंगी येथील जैन स्थानक या आणि अशाअनेक तीर्थक्षेत्र पर्यटन सर्किटची योजना बनवणेगरजेचेआहे.

जागतिक प्रसिध्द अजंठा लेणी, पांडव लेणी या ही या उत्तर महाराष्ट्र विभागात येतात.

यावल, पाल, तोरणमाळ, गौताळा, नांदूर माध्यमेश्वरपक्षी अभयअरण्य यासाठीचाअधिक प्रचार आणि प्रसारहोणेअपेक्षितआहे.

गड, किल्ले, ट्रॅकिंग यासाठी अतिशय आव्हानात्मक असे अनेक ठिकाणे या उत्तर महाराष्ट्र विभागात उपलब्ध आहेत. यासाठी सुध्दा पर्यटन संधी उपलब्ध करता येतील.

**रेल्वे** : भारतातील अतिशय व्यस्त अशी भुसावळ मनमाड यासारखी मोठी जंक्शन हीउत्तर महाराष्ट्र विभागातआहेत, भुसावळ हे मध्य रेल्वेचे डिव्हीजन ब्रिटीश काळापासूनअस्तित्वातआहे.

तरीही यामध्ये अनेक नवीन बदल करणे गरजेचेआहे यात प्रामुख्याने इगतपुरी ते धुळे, भुसावळ, औरंगाबादअशा मेमु डेमुकिंवा मुंबईत ज्या नवीन एसी लोकलमुळे जुने रॅक हे अतिरिक्त होतील ते या मार्गावर चालवता येतील भुसावळ इगतपुरी या दरम्यान होणाऱ्या अतिरिक्त रेल्वे मार्गामुळे हे शक्य होईल, याचा मुख्य फायदा हा उत्तर महाराष्ट्र विभाग हा कृषी, व्यापार आणि उद्योगांसाठी अधिक जवळ येईल.

मनमाड इंदोर रेल्वे मार्ग, धुळे ते नरडाणा दरम्यान रेल्वे जोडणी या अनेक दिवसांच्या मागण्या पूर्ण होणे अपेक्षित आहे.

प्रस्तावित सूरत ते चेन्नई हाद्रुतगती मार्ग नाशिकमधून जाणार आहे या महामार्गावर सोबतच जर रेल्वेचा हायस्पीड कॉरीडोर बनवला तर उत्तर महाराष्ट्र विभागाचा कायापालट निश्चित होईल.

नाशिक येथे असलेली रेल्वे टर्मिनलची मागणी पूर्णत्वास जाणे गरजेचे आहे. भविष्यातील मुंबईवर येणारा अतिरिक्त ताण कमी करण्यासाठी याची खरी गरज आहे.

उत्तर महाराष्ट्र आणि कोकणगोवा या विभागातील व्यापार उद्योग वाढावा यासाठी भुसावळ-मडगाव अशी पनवेल मार्गे रेल्वेसुरू करण्यात यावी. या रेल्वेचे वेळापत्रक संध्याकाळी ५ वाजता भुसावळवरून निघून सकाळी ६ वाजता रत्नागिरी तर ९.३० वाजता मडगाव येथे पोहचेल असे ठेवल्यास या मार्गावर रेल्वेला निश्चित खुप मोठा प्रतिसाद मिळेल.

**रस्ता** : उत्तर महाराष्ट्र विभागातून गुजरात येथील मोठी बंदरे हजिराकांडला पिपावा मुंदरा अडाणी या साठी मोठ्या प्रमाणावर वाहतूक ही नाशिक, धुळे, अहमदनगर या जिल्ह्यातील होत असते. या रस्त्यांचे सहापदरीकरण करणे गरजेचे आहे. तसेच जिल्हातंर्गत रस्ते हे निधी उपलब्ध होत नसल्यामुळे कायम दुरावस्थेत असतात. यासाठी भरीव निधी मिळणे अपेक्षित आहे.

**विमान सेवा** : नाशिकमधील विमानतळहा मुंबईचा अतिरिक्त ताण कमी व्हावा म्हणून वापरला जाऊ शकतो. यात प्रामुख्याने आखाती देशात होणारी हवाई वाहतूक नाशिकमधून केल्यास विमान कंपनी मोठी रक्कम वाचवू शकतात. कृषी माल निर्यातीसाठी खूप मोठी संधी यातून निर्माणहोणारआहे.

नाशिक विमानतळाची धावपट्टी हीखूप मोठी असून येथेरात्रीची उड्डाणेतसेच पार्किंग यासाठी सोय आहे. मुंबर्सत काही वेळा पावसाळ्यात विमानवाहतूक हीइतर विमानतळ येथेवळवली जाते. नाशिक विमानतळ हा अशाप्रसंगी निश्चित उपयोगी ठरू शकतो.

नाशिकचे भौगोलिक स्थान असे आहे की, येथून आंतरदेशीय विमानांना खूप मोठा प्रवासीवर्ग मिळूशकतो. यात प्रामुख्याने वापी, सिल्वासा, धुळे, अहमदनगर जिल्हा, शिर्डी, मालेगाव या मोठ्या शहरांचा समावेश होतो. यासाठी सर्व महत्वाच्या मार्गांवर विमानसेवा चालू होणे गरजेचेआहे.

**शिक्षण** : उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ हे या विभागात कार्यरत आहेत. यासोबत आयआयएम, आयआयटी या संस्था आल्यातर शिक्षणक्षेत्र हे अधिक सक्षम होईल.

**आरोग्य** : आयआयएमच्या धर्तीवर नाशिकमध्ये होऊ घातलेल्या वैद्यकिय शिक्षण महाविद्यालयासोबत एक मोठे इस्पितळ उभारले जाऊ शकते.

**कन्व्हेंशन सेंटर** : नाशिकमध्ये दर बारा वर्षांनी कुंभमेळा असतो. यावेळी शासन हे करोडो रूपये खर्च करून साधुग्राम, पोलीस निवारावस्ती केंद्र, इस्पितळ इतर सुविधा केंद्र उभारत असते आणि ते सहा महिने वापर झाला की पुन्हा काढून टाकते. सदर जागाही शासन अधिग्रहीत आहे. या जागेवर एक सर्व सुविधायुक्त असे कायम स्वरूपी कन्व्हेंशनसेंटर उभारले जाऊ शकते आणि याचा वापर हा इतर ११ वर्ष उत्तर महाराष्ट्र प्रदर्शन केंद्र तसेच इतर कॉन्फरन्ससाठी केलाजाऊ शकतो.

याशिवाय इतरही अनेक विकासाच्या संधी आपल्या उत्तर महाराष्ट्र विभागात आहे, आमची एकच मागणी आहे थोडा है थोडे की जरूरत है।

# विडी तंबाखु विक्रेत्यांनी नवीन व्यवसायाकडे वळावे - ललित गांधी

## महाराष्ट्र खाद्य वस्तु विक्रेता महासंघ स्थापन






महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार करताना संघटनेचे अध्यक्ष शशांक राव, व्यासपीठावर खास. गजानन किर्तीकर, नंदकुमार हेगिष्टे, प्रविण खंडेलवाल व अन्य मान्यवर दुसऱ्या छायाचित्रात मनोगत व्यक्त करताना अध्यक्ष ललित गांधी.

मुंबई विडी तंबाखू व्यापारी संघाच्या ४३ वा वर्धापन दिन दामोदर हॉल, परेल येथे प्रमुख पाहुणे शिवसेना नेते खासदार मा. गजानन किर्तीकर, प्रविणजी खंडेलवाल-राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी-कॅट, ललित गांधी-अध्यक्ष महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉम र्स, इंडस्ट्री, जे. पी. राव, हेड इंडस्ट्री अफेयर्स, आयटी.सी.लि. संजय चौधरी-रिजनल इंडस्ट्री अफेयर्स मॅनेजर, जी.पी.आय. लि. शंकरभाई ठक्कर, महेशभाई बकीया, दिलीप महेश्वरी आणि संघातील मान्यवर, संलग्न संस्थेचे प्रतिनिधी संघातील सर्व सदस्य, कुटुंबियांच्या उपस्थितीत संपन्न झाला यावेळी ते बोलत होते.

मुंबई विडी तंबाखू व्यापारी संघाच्या माध्यमातुन महाराष्ट्र खाद्यवस्तु महासंघाचे नामकरण खासदार गजानन कीर्तीकर साहेबांच्या हस्ते करण्यात आले. संघाचे मुखपत्र निर्धार विशेषांकाचे प्रकाशन कीर्तीकर साहेब व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याच कार्यक्रमात संघाचे कार्याध्यक्ष नंदकुमार हेगिष्टे यांना जीवनगौरव पुरस्कार, तसेच महिला भगिनी व जेष्ठ कार्यकर्ता व उत्कृष्ठ कार्यकर्ता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रमुख पाहुणे खासदार गजानन किर्तीकर यांनी संबोधित करताना संघटनेने आजपर्यंत केलेल्या कार्याचा गौरव केला.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललितजी गांधी यांनी आपल्या भाषणात पुढे सांगितले की, समस्या या आपल्या पाचवीला पुजलेल्या आहेत. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या समस्येवर मात करण्यासाठी काम करत आहे.

कॅट चे राष्ट्रीय सरचिटणीस प्रविणजी खंडेलवाल यांनी संघाच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. संघाचे कार्याध्यक्ष नंदुकुमार हेगिष्टे यांनी आपल्या भाषणात संघाच्या ४० वर्षातील ज्ञात अज्ञात सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

विडी तंबाखु विक्रीच्या व्यवसायाच्या सामाजिक जाणीवेतुन विरोध होत असतो तसेच क्लीष्ट व जाचक सरकारी कायद्यामुळे हा व्यापार करणे सोपे नाही. मात्र या व्यापारावर अवलंबुन असलेल्या कोट्यावधी लोकांचा विचार करून विक्रेत्यांनी आपल्या व्यवसायत काळानुरूप बदल करून वेगवेगळ्या व्यवसायाकडे वळावे असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

बदलाच्या या प्रक्रियेला सुरूवात म्हणुन खाद्य वस्तु विक्रेता महासंघाची स्थापना हे स्वागतार्ह पाऊल असल्याचेही ललित गांधी यांनी सांगितले.

◆◆◆




खाद्य वस्तु विक्रेता महासंघ नाम फलकाचे अनावरण करताना खा. गजानन किर्तीकर, ललित गांधी, प्रविण खंडेलवाल, शशांक राव, नंदकुमार हेगिष्टे, शंकर ठक्कर व अन्य मान्यवर.

# 'महाराष्ट्र चेंबर ' व ठाणे बेलापूर इंडस्ट्री असोसिएशन तर्फे 'बिझनेस मध्ये ग्रोथ कशी घडवून आणायची? या विषयावर व्याख्यान संपन्न







'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर' व ठाणे बेलापूर इंडस्ट्री असोसिएशन च्या वतीन नयूरो सायन्स चा उपयोग करून बिझनेस मध्ये ग्रोथ कशी घडवून आणायची या संबंधी चे व्याख्यान आयोजित केले होते . दिनांक २६ मार्च २०२२ रोजी TBIA च्या राबले येथील हॉल मध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. NLP VÁk श्री उमेश सोमण यांनी NLP सारखा कठीण विषय अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितला. बाह्य मन आणि अंतर्मन यांचा आपल्या निर्णय प्रक्रियेतला सहभाग, एखादी कृतीची प्रेरणा व त्या कृतीची अंमलबजावणी, त्यासाठी लागणारी कार्यशक्ती ह्यांचा उगम कुठे व कसा होतो, आपल्या लहानपणी झालेल्या सांस्कारांचा प्रभाव आपण मोठेपणी घेत असलेल्या निर्णयांवर कसा असतो यावर श्री उमेश सोमण यांनी अतिशय सोप्या भाषेत मार्गदर्शन केले .

बिझनेस क्षेत्रातील ७५ जणांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला व असा पूर्ण दिवसाचा कार्यक्रम असावा अशी इच्छा व्यक्त केली. महाराष्ट्र चेंबर च्या उपाध्यक्षा सौ शुभांगी तिरोडकर यांनी महाराष्ट्र चेंबर च्या विविध उपक्रमांची माहिती दिली, चेंबर चे सभासद होण्याचे फायदे समजावून सांगितले. TBIA चे ट्रेझरर श्री कौस्तुभ गोखले यांनी TBIA विषयी माहिती दिली .

बिझनेस नेटवर्किंग ची एक नवीन संकल्पना या वेळी अंमलात आणली. सर्व बिझनेसमेना ते येत्या सहा महिन्यात खरेदी करणार असलेल्या सर्विसेस किंवा प्रॉडक्ट्स लिहून देण्यास सांगण्यात आले व त्या प्रमाणे तिथेच मीटिंग्ज घडून आणल्या. श्री. निखिल गुर्जर यांनी या सत्राचे नियोजन केले.

सौ सोनाली गंद्रे यांनी सूत्र संचालन केले तर आभार प्रदर्शन ॲड. सौ. कृष्णा ठक्कर यांनी केले, बिंदा कन्याळकर, गौरी खेर, मनीष पाटील, अपर्णा क्षीरसागर, केशव कोरगावकर, दीपा राऊत, गणपत कोरडे, निलेश घरत, सुबोध मिस्त्री या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या नवी मुंबई, ठाणे व पालघर शाखेच्या गव्हर्निंग कौन्सिल कार्यकर्त्यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

◆◆◆

# वित्त अधिनियम २०२२ मुळे जीएसटीमध्ये झालेल्या परिवर्तनावर वेबिनार संपन्न

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चर व डायरेक्टर जनरल ऑफ टॅक्स पेअर सर्विसेस यांच्या संयुक्त विद्यमानेबुधवार दि. ११ मे २०२२ रोजी वित्त अधिनियम २०२२ मुळे जीएसटीमध्ये झालेल्या परिवर्तनावर वेबिनार संपन्न झाले.

या वेबिनार मध्ये महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी मुख्य आयुक्त जीएसटी नागपूर अशोक, डीजी डीजी नवी दिल्लीचे श्री प्रमोद कुमार, एडीजी, डीजीटीएस मुंबई राजेश वर्मा, एस. के. महतो, दिपक गुप्ता उपस्थित होते याप्रसंगी सीजीएसटीचे अधीक्षक दिपक गुप्ता यांनी वित्त अधिनियम २०२२ मुळे जीएसटी मध्ये झालेल्या परिवर्तनाची माहिती उपस्थितांना चित्रफितीद्वारे दिली.

◆◆◆

HIMI
Shipping Services Pvt. Ltd.



HIMI Shipping Services Pvt. Ltd. a Shipping Logistics, Customs Broking, Freight Forwarding Company having its presence more than Two Decades in major ports of India and across the World.

HIMI Shipping was founded in Nasik, Maharashtra with its Major Corporate Office in Mumbai.

HIMI Shipping is recognized as a Well-Established, Multi-Locational, Multi-Faceted International Freight Forwarding Privately owned Entity, providing Vital Physical links in the Supply Chain, Freight Forwarding and Custom Broking.

We have vast Network of Shipping Agents worldwide for diverse fields of line, which gives Leverage to Manage, Handle and Promote, the Air & Sea, Imports and Exports consolidation for various Clients at every Major Airport & Seaport.

Customs Clearance is an Integral as well as Critical part of Freight Forwarding. Himi Shipping has a TEAM of Talented and Qualified people to provide you with Customized Solutions and Consultancy in this critical domain.

We have an In-house Team for Customs Clearance for all the activities which are last mile & contributor to Growth, Operations, and Deliverables.

We also provide Door Delivery service, i.e. Ex-Work pick up and door delivery at customers places where all the formalities such as placing the Container, Custom formalities at Shippers port, Shipping the Goods to the Importing Country again Custom formalities at Destination Port and finally truck it to Customers door.

"WE ARE ALL IN A PROCESS OF SHIFTING TO EFFICIENCY MAXIMIZATION BY INTRODUCING DOMAIN EXPERTISE & FOCUSING ON CORE DELIVERABLES"

As Majority of the Manufacturing Companies are finding more favorable and better Opportunities in India, where knowledge, efficiency as well as time is scarcity.

HIMI Shipping offers their services to the Clients which add value & at the same time mandate regulatory Compliances for running business in the Country.

We take care of your goods and understand how critical and important is safe travelling of goods from one corner to another.

**C. S. Singh**
Managing Director,
Himi Shipping Services Pvt. Ltd.

**NASHIK HEAD OFFICE**
Plot NO. M-43, MIDC, Ambad, Nashik 422010
0253-2385111, 2388111, 2380000
9422268111, 9762669111

**MUMBAI BRANCH OFFICE**
Office No. 201, Arenja Chambers-II, Plot NO. 07,
Sector 15, CBD Belapur, Navi Mumbai – 400614
9422268111, 9762669111




# Make a Promising career in FASHION and INTERIOR DESIGN

CODT is driven by shared purpose to make a better world through design and innovation. To provide the best holistic education and make the art of creating extraordinary designs available to every one. Through trans-disciplinary and collaborative research projects, we create unconventional methods to have an extraordinary mind set and skills of the student to execute extraordinary designs. through high impact experimental learning environments, we launch the next generation of innovative designers

- **100% JOB ASSISTANCE**
- **100% BUSINESS ASSISTANCE**
- **7000+ ALUMNI**
- **12 YEARS ACADEMIC SUCCESS**
- **EXPERIENCED FACULTY, GUEST LECTURERS.**
- **CELEBRITY WORKSHOPS AND SEMINARS**

ND's FILM WORLD

**Associate Partner**

SANDIP UNIVERSITY
UGC Recognised

**University Partner**

B.VOC Course
Degree in Fashion Design

B.VOC Course
Degree in Interior Design

Certification Courses In Fashion Design
- 11 Months
- 11 Months (Advance)
- 6 Months
- 3 Months

Certification Courses In Intetior Design
- 11 Months
- 11 Months (Advance)
- 6 Months
- 3 Months

**Address - CODT Registration Office**
37, Bhushan Colony, Near Govt. Polytechnic, Behind
MJ Collage , Jalgaon, Maharashtra - 425001

www.codt.in
codt.outreach@gmail.com
**+91 880 880 4984**

**Date of Publish : 31st May 2022** **Page No. 1 to 52**
WPP License No.: NMR/Tech/WPP-21/Nashik/2022-23 License to Post without prepayment. Posted on 31st May 2022 at Nashik
Head office Regd. No: NSK/RNP-82/2021-2023. Registered with Regr. of News Papers for India, Delhi under Regd. No. 20803/71

bmm CONVENTION 2022

JOINTLY PRESENTS

# BIZCON

11th August 2022

**BUSINESS CONFERENCE**

MACCIA 100
Apex Chamber of the State
1927-2027
महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर



## BUSINESS SUMMIT & EXHIBITION

**11th to 14th August 2022** @ Atlantic City New Jersey (USA)

**ENCOURAGE, EDUCATE, ENHANCE, ENABLE THE MAHARASHTRIAN BUSINESS COMMUNITY**

Great opportunity for Entrepreneurs, Industrialist, Agro & Food processors, Startups & Innovators etc. to collaborate and enhance business activities with American associates.

**BIZCON** is a unique platform for Professionals and Entrepreneurs for networking opportunities, entrepreneurial ideas, seeking investors, mentors, technology partners.

**KEY FEATURES**

- Showcase your products/Services in exhibition
- Present your ideas and business plans to Angel Investors & Venture Capitalists
- Get technical upgradation and/or market expansion support from American counterparts for the business growth to next level.
- B2B meetings & networking with Industry leaders
- Grand cultural events for 4 days by various eminent artists

**We believe in continuous improvement, creativity and change for Business to grow**

**MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE**
**For more details & Registration pls contact** : **Mr Sagar Nagare,** Secretary General (A)
**Cell :** 9870417866 / 8286008977 **Email :** sagar@maccia.org.in



आम्ही जात आहोत
BMM 2022 च्या अधिवेशनाला
तुम्ही पण येताय ना ?

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक विनी दत्ता यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स, सातपूर, नाशिक-७ येथे छापुन २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक-१ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to:
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
201, Sarda Sankul, Vakil Wadi, M.G. Road, Nashik-1